



# गोदातीर समाचार

स्थापना - १९६२

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com






* वर्ष ६४ वे * अंक १९१ * नांदेड * शुक्रवार, दि. १८ जुलै २०२५ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211


# जितेंद्र आव्हाड आणि गोपीचंद पडळकर यांच्या कार्यकर्त्यांची चक्क विधानभवनाच्या लॉबीत हाणामारी

**मुंबई (प्रतिनिधी)–** राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड आणि भाजप आमदार गोपीचंद पडळकर यांच्या कार्यकर्त्यांमध्ये हाणामारी झाली आहे. विधानभवनाच्या लॉबीतच दोघांचे कार्यकर्ते भिडल्याचं पाहायला मिळालं. जितेंद्र आव्हाड यांचे कार्यकर्ते नितीन देशमुख यांना मारहाण झाली आहे. गोपीचंद पडळकर यांचा कार्यकर्ता ऋषिकेश टकले याने ही मारहाण केली आहे. या संपूर्ण घटनेचा व्हिडीओ देखील व्हायरल झाला आहे.

पहिल्यांदा पडळकरांच्या कार्यकर्त्यांनी हल्ला केल्याचे जितेंद्र आव्हाड म्हणाले. आम्हाला याच्यापेक्षा जास्त पुरावा देण्याची गरज नसल्याचे आव्हाड म्हणाले. जर तुम्ही विधानसभेत गुंडाना प्रवेश देणार असाल आणि ते हल्ले करणार असतील तर कोणतेच लोक सुरक्षीत नाहीत असे आव्हाड म्हणाले. मला शिव्या दिल्या आहेत. कुत्रा, डुक्कर, तुला मारुन टाकू अशा धमक्या दिल्याचे आव्हाड म्हणाले. मलाच मारण्यासाठी सगळे आले होते असा आरोप आव्हाड यांनी केला. विधानसभेत आमदार सुरक्षीत नसतील तर कशाला राहायचं आमदार? असा संतप्त सवाल यावेळी जितेंद्र आव्हाड यांनी केला आहे. तो मवाल्यासारखा येतो आणि आमच्या आया बहिणीवरुन शिव्या देतो, त्याला ऑफिशियल लॅग्वेंज म्हणून डिक्लेर करा ना असे म्हणत आव्हाडांनी पडळकरांवर टीका केली. सत्तेचा एवढा माज असे म्हणत आव्हाड चांगलेच संतापल्याचे पाहायला मिळाले.

दरम्यान, या घटनेनंतर प्रसारमाध्यमांनी गोपीचंद पडळकर यांच्याशी देखील संवाद साधण्याचा प्रयत्न केला. यावेळी मला याबाबत काही माहिती नसल्याचे वक्तव्य पडळकर यांनी केले आहे. त्याला जाऊन भेटा असे पडळकर म्हणाले. तो तिथं आहे, त्याच काय झालं तिथं जाऊन बघा, माझ्या ओळखीचा नाही असे पडळकर म्हणाले.



**हे विधानसभेला शोभणार नाही, कारवाई होणार –मुख्यमंत्री फडणवीस**

घडलेली घटना योग्य नाही, मारामारी करणं, विधानभवनात करणं योग्य नाही. विधानसभा अध्यक्ष आणि सभापतींच्या अंतर्गत हा परिसर येतो, त्यांनी घटनेची दखल घ्यावी. अध्यक्षांनी कडक कारवाई करावी, अशी विनंती मी केली आहे. हे विधानसभेला शोभणारं नाही, त्यामुळे कारवाई झालीच पाहिजे, अशी प्रतिक्रिया घडलेल्या घटनेवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

# नांदेड जिल्ह्याला आज आणि उद्या येलो अलर्ट जारी

**नांदेड (प्रतिनिधी)–** प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र मुंबई यांनी दि. १६ जुलै २०२५ रोजी दिलेल्या सूचनेनुसार नांदेड जिल्ह्यासाठी दि. १८ व १९ जुलै २०२५ या दोन दिवसांसाठी येलो अलर्ट जारी केलेला आहे. ह्या तीन दिवसांच्या कालावधीत जिल्ह्यात तुरळक ठिकाणी ताशी ३० ते ४० किमी वेगाने वादळी वारे वाहण्याची, विजेच्या कडकडाटासह व ढगांच्या गडगडाटासह हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची अधिक शक्यता वर्तविली आहे. या नैसर्गिक आपत्ती संदर्भात सर्व संबंधित यंत्रणा आणि जनतेने खबरदारी घ्यावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

**या गोष्टी करा :** विजेच्या गडगडाटासह पावसाची पूर्वकल्पना असल्यास बाहेर जाणे टाळा. जर मोकळ्या जागेत असाल आणि जवळपास कुठल्याही सुरक्षित इमारतीचा आसरा नसेल तर सखल जागेत जाऊन गुडघ्यात डोके घालून बसा. आकाशात विजा चमकत असल्यास घरात किंवा सुरक्षित इमारतीत आश्रय घ्या. घराच्या बाल्कनी, छत अथवा घराबाहेरील ओट्यावर थांबू नका. आपण घरात असाल आणि घरातील विद्युत उपकरणे चालू असतील तर त्या वस्तू त्वरित बंद करा. तारांचे कुंपण, विजेचे खांब व इतर लोखंडी वस्तूंपासून दूर रहा. पाण्यात उभे असाल तर तात्काळ पाण्यातून बाहेर पडा. तुमच्या स्मार्ट मोबाईल फोनमध्ये 'दामिनी', 'सचेत' हे दोन ॲप डाऊनलोड करा 'दामिनी' ॲप तुमच्या आजूबाजूला वीज विषयक संभाव्य धोके दर्शविते तर 'सचेत' ॲपमुळे तुम्हाला तुमच्या आजूबाजूच्या हवामानाविषयी अचूक इशारे व माहिती मिळते.

**या गोष्टी करु नका :** आकाशात विजा चमकत असल्यास घरातील लँडलाईन फोनचा वापर करू नका. शॉवरखाली अंघोळ करू नका. घरातील बेसिनचे नळ, पाण्याची पाईपलाइन यांना स्पर्श करू नका तसेच कुठल्याही विद्युत उपकरणांचा वापर करू नका. विजेच्या गडगडाटासह वादळी वारे चालू असताना लोखंडी धातूच्या सहाय्याने उभारलेल्या तंबूमध्ये किंवा शेडमध्ये आसरा घेऊ नका. उंच झाडाच्या खाली आसरा घेऊ नका. धातूंच्या उंच मनोऱ्याजवळ उभे टाकू नका. जर आपण घरात असाल तर उघड्या दारातून अथवा खिडकीतून वीज पडताना पाहू नका. हे बाहेर थांबण्याइतकेच धोकादायक आहे. असे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# महाराष्ट्रात १०० युनिटपर्यंत वीज वापरणाऱ्यांना २६ टक्के वीजदर कपात

**मुंबई (प्रतिनिधी)–** वाढत्या वीज बिलांबाबत जनतेत वाढती चिंता असताना, महाराष्ट्र सरकारने बुधवारी सुरू असलेल्या पावसाळी अधिवेशनादरम्यान एक महत्त्वपूर्ण घोषणा केली, ज्यामुळे लाखो ग्राहकांना मोठा दिलासा मिळाला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दरमहा १०० युनिटपर्यंत वीज वापरणाऱ्या ग्राहकांसाठी वीजदरात २६ टक्के कपात जाहीर केली.

महायुती सरकारने जनतेला दिलेली 'भेट' असे या निर्णयाचे वर्णन करण्यात आले असून, यामुळे राज्यातील सुमारे ७० टक्के वीज ग्राहकांना फायदा होण्याची शक्यता आहे, कारण बहुसंख्य ग्राहक १०० युनिटच्या वापराच्या कक्षेत येतात. फडणवीस यांनी सभागृहाला आश्वासन दिले की, नजीकच्या भविष्यात वीजदरात कोणतीही वाढ होणार नाही, ज्यामुळे घरगुती बजेटसाठी स्थिरता आणि अंदाज वर्तवता येईल. काँग्रेस आमदार सतेज पाटील यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना ही घोषणा करण्यात आली. पाटील यांनी ग्राहक सुनावणी न घेता निर्णय लागू केल्याबद्दल सरकारवर टीका केली होती.

# नांदेड जिल्हा बँकेचे माजी अध्यक्ष दहिफळे, मुंडे भाजपात

**मुंबई/किनवट (प्रतिनिधी)–** नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे माजी अध्यक्ष व जि.प.चे माजी बांधकाम सभापती दिनकर दहिफळे, किनवट बाजार समितीचे सभापती गजानन मुंडे तसेच ८ संचालकांनी गुरुवारी भाजपचे प्रदेशाध्यक्ष आ. रवींद्र चव्हाण आणि खा. अशोकराव चव्हाण यांच्या उपस्थितीत पक्षप्रवेश केला.

मुंबईत प्रदेश मुख्यालयात झालेल्या या कार्यक्रमाला आ. तुषार राठोड, नांदेड महानगराध्यक्ष अमरनाथ राजूरकर, नांदेड ग्रामीण दक्षिणचे अध्यक्ष डॉ. संतुकराव हंबर्डे, माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन आदी उपस्थित होते.

राष्ट्रवादी शरद पवार गटाचे प्रदेश युवक सचिव अजित साबळे, किनवट बाजार समितीचे संचालक श्रीराम कांदे, राष्ट्रवादीचे युवक तालुका अध्यक्ष तसेच किनवट बाजार समितीचे संचालक बालाजी बामणे, सुनील घुगे, प्रल्हाद सातव, प्रेमसिंग साबळे, कैलास बिज्जमवार, विद्या दासरवार, कुसुम मुंडे यांच्यासह शिवराज मुंडे, माधव मुंडे, उपसरपंच तारुसिंग पडवाळ, जेऊसिंग नाईक चोपाडे, संजय मुंडे, करतारसिंग बामण, रॉबिन साबळे यांनीही भारतीय जनता पार्टीत प्रवेश केला.



# ट्रॅव्हल्स चालकांनीच दहा लाख रुपये ऐवजाची प्रवाशाची बॅग केली लंपास

## वजिराबाद ठाण्यात छत्तीसगडच्या तिघांवर गुन्हा दाखल

**नांदेड (प्रतिनिधी)–** जहागीरदार ट्रॅव्हल्सने लातूर ते हिंगोली गेट असा प्रवास करणाऱ्या एका गुत्तेदाराची ९ लाख ७७ हजार रुपये ऐवज असलेली बॅग ट्रॅव्हल्सच्या डिक्कीतून ट्रॅव्हल्स चालकांनीच लंपास केली. ही घटना दि. १३ जुलै रोजी सायंकाळी सात ते आठच्या दरम्यान लातूर ते हिंगोली गेट प्रवासादरम्यान घडली.

नांदेड शहराच्या समीराबाग वाघी रोड येथील गुत्तेदार हर्षलखान हर्षदखान पठाण (वय २९) हा लातूरवरून हिंगोली गेट नांदेड असा जहागीरदार ट्रॅव्हल्सने प्रवास करत होता. या प्रवासादरम्यान त्यांनी ट्रॅव्हल्सच्या पाठीमागील डिक्कीमध्ये आपली बॅग ठेवली होती. त्या बॅगमध्ये नऊ लाख ३७ हजार ३४० रुपये किमतीचे १६६.६१ ग्रॅम सोन्याचे दागिने आणि नगदी ४० हजार रुपये असा ९ लाख ७७ हजार ३४० रुपयांचा मुद्देमाल होता. लातूर ते हिंगोली गेट नांदेड अशा प्रवासादरम्यान ट्रॅव्हल्स चालक गुरुदेवसिंग लालसिंग जर्गर (वय ४४ रा. न्यू रामनगर रायपूर छत्तीसगढ), चालक असलमखान (रा. बराज मोर गाव, राज्य छत्तीसगढ) आणि




क्लीनर विनोदकुमार कन्हैयालाल राजपूत (वय ४० रा. गंज चौक राज्य छत्तीसगड) यांनी संगणमत करून सदर मुद्देमाल असलेली बॅग लंपास केली.

नांदेडच्या हिंगोली गेट येथे लक्झरी बस आल्यानंतर आपली बॅग नसल्याचे त्यांच्या लक्षात आले. परंतु प्रवाशांच्या बॅगा देण्यासाठी लातूर ते हिंगोली गेट येईपर्यंत बस अनेक ठिकाणी थांबून या चालकांनी प्रवाशांच्या बॅगा दिल्या होत्या. यादरम्यान सदरची बॅग या तिघांनी लंपास केल्याचे हर्षलखान पठाण यांनी आपल्या तक्रारीत नमूद केले आहे. वजिराबाद पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक परमेश्वर कदम यांच्या आदेशावरून या प्रकरणात वरील छत्तीसगडच्या तिन्ही चालकांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील दोन आरोपींना अटक करण्यात आली असून पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक प्रशांत लोंढे करत आहेत.

# भरस्त्यात महिलेशी गैरवर्तन करणाऱ्या दोघांना पोलिसांचा प्रसाद

## आसना सांगवी परिसरातील घटना

**नांदेड (प्रतिनिधी)–** येथील सांगवी आसना बायपासकडून नांदेड शहरात येणाऱ्या एका महिलेच्या दुचाकीला कट मारून तिच्यासोबत गैरवर्तन करणाऱ्या तिघांपैकी दोघांना विमानतळ पोलिसांनी ताब्यात घेतले असून त्यांना चांगलाच प्रसाद दिला आहे. या प्रकरणाचा व्हिडिओ सोशल माध्यमावर व्हायरल झाल्याने पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी गंभीर दखल घेत विमानतळ पोलिसांना सूचना दिल्यानंतर अवघ्या काही तासाच्या आत या रोडरोमियोंना पोलिसांनी ताब्यात घेऊन अटक केली आहे.



शहराच्या विमानतळ सांगवी परिसरातील एका चारचाकी गाडीच्या शोरूमसमोर एक महिला आपल्या एका मुलाला सोबत घेऊन दुचाकीवरून शहरात येत होती. यावेळी पाठीमागून एका दुचाकीवरून ट्रिपल सीट आलेल्या रोड रोमिओ सार्थ संजय पावडे आणि त्याच्या दोन साथीदारांनी महिलेच्या दुचाकीला कट मारला आणि तिच्यासोबत हुज्जत घालत गैरवर्तन केले. एवढेच नाही तर अश्लील शिवीगाळ केली. हा प्रकार गुरुवार, दि. १८ जुलै रोजी दुपारी दोनच्या सुमारास भर रस्त्यात घडला. सदर महिलेसोबत गैरवर्तन करणाऱ्या युवकांना मात्र उपस्थितांनी अटकाव करण्याऐवजी व्हिडिओ चित्रीकरण करण्यात धन्यता मानली. सदर महिलेच्या दुचाकीला धक्का देऊन खाली पाडून तिला शिवीगाळ करत हे तिन्ही रोडरोमिओ तेथून पसार झाले. घटनेचा व्हिडिओ सोशल माध्यमावर व्हायरल झाल्याने विमानतळ पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक गणेश चव्हाण, रस्ता सुरक्षा पथक अधिकारी, भाग्यनगर पोलीस यांना वरिष्ठांच्या मिळालेल्या सूचनांवरून त्यांनी तातडीने आपल्या कर्मचाऱ्यांमार्फत याच भागात फिरणाऱ्या या तिन्ही रोड रोमिओंपैकी दोघांना ताब्यात घेतले आहे. ताब्यात घेतलेल्यापैकी एक अल्पवयीन असल्याचे सांगण्यात आले.

शहरात अशा प्रकारच्या घटना घडल्या तर तात्काळ नागरिकांनी सायबर सेल किंवा जवळच्या पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा. नांदेड पोलीस निर्भया मिशन अंतर्गत सुरू असलेल्या रस्ता सुरक्षा पथक तातडीने घटनास्थळी जाऊन आरोपींच्या मुस्क्या आवळणार आहे. शहरात सकाळी आणि संध्याकाळी रस्ता सुरक्षा पथक कार्यरत असून नागरिकांनी अशा टवाळखोर युवकांची झुंड कुठे दिसली तर जवळच्या पोलिसांशी संपर्क साधावा असे आवाहन पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी केले आहे.

# भारताला मोठं यश, आकाश प्राईम एअर डिफेन्सची चाचणी यशस्वी

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** ऑपरेशन सिंदूरच्या दरम्यान चीन, पाकिस्तान आणि तुर्की या तीन देशांनी भारताविरुद्ध भूमिका घेतली होती. आता या तीन देशांना धडकी भरवणारी चाचणी भारतानं केली आहे. भारताच्या आकाश प्राईम एअर डिफेन्सची लडाखमध्ये यशस्वी चाचणी घेण्यात आली आहे. ही चाचणी १५ हजार फूट ऊंचीवर घेण्यात आली. यामुळं दुश्मन देश भारताविरोधात पाऊल टाकताना पहिल्यांदा विचार करतील. भारताविरुद्ध पाऊल उचललं तर त्यांना नुकसान होऊ शकतं.

संरक्षण अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार परिक्षण सुरु असताना जमिनीवरुन हवेत मारा करणाऱ्या मिसाईलनं अत्यंत ऊंच क्षेत्रात वेगानं जाणाऱ्या विमानांवर दोन वेळा थेट प्रहार केला. आकाश प्राईम सिस्टीम भारतीय सेनेत आकाश एअर डिफेन्स सिस्टीमची तिसऱ्या आणि चौथ्या रेजिमेंटची स्थापना करेल. या स्सिटीमनं ऑपरेशन सिंदूरच्या दरम्यान चीनच्या विमानांना आणि तुर्कीच्या ड्रोनच्या हल्ल्यांना निष्प्रभ केलं होतं.







# नांदेड येथून सुटणारी तिरुपती विशेष गाडी धर्मावरमपर्यंत विस्तारित

## तिरुपती विशेष गाडीच्या मार्गातही बदल

**नांदेड (प्रतिनिधी)–** दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड येथून दर शुक्रवारी सुटणाऱ्या तिरुपती विशेष गाडीला धर्मावरम स्टेशनपर्यंत विस्तारित करण्याचा निर्णय घेतला आहे.

गाडी क्रमांक ०७१८९ नांदेड – तिरुपती विशेष गाडी धर्मावरमपर्यंत विस्तारित करण्यात आली आहे, ही विशेष गाडी हजूर साहिब नांदेड रेल्वे स्थानकावरून दि. १, ८, १५, २२ आणि २९ ऑगस्ट रोजी दर शुक्रवारी दुपारी १६.३० वाजता सुटेल आणि मुदखेड, धर्माबाद, बासर, निजामाबाद, कामारेड्डी, मेडचल, चेरलापल्ली, नलगोंडा, मिर्यालागुडा, नाडीकुडे, पिदुगुरल्ला, नेमलीपुरी, रोमपिचेर्ला, विनुकोंडा, डोनाकोंडा, मरकापुरम रोड, कुंबम, गिद्दलूर, दिगुवामेट्टा, नंदयाल, जम्मालामादुगु, येरागुंतला, कडप्पा, नांदलूर, रझाम्पेटा, कोदुरू आणि रेनिगुंटा, तिरुपती, पकाला, पिलर, मदनापल्ले, कादीरी मार्गे धर्मावरम येथे दुसऱ्या दिवशी शनिवारी सायंकाळी ५.३० वाजता पोहोचेल.



गाडी क्रमांक ०७१९० तिरुपती नांदेड विशेष गाडी धर्मावरमपर्यंत विस्तारित करण्यात आली आहे. ही गाडी धर्मावरम येथून दि. ३, १०, १७, २४ आणि ३१ ऑगस्ट रोजी रविवारी सकाळी ५.३० वाजता सुटेल आणि आलेल्या मार्गानेच हजूर साहिब नांदेड येथे सोमवारी सकाळी ८.३० वाजता पोहोचेल. या विशेष गाड्यां मध्ये २ एसी, ३ एसी, स्लीपर आणि सामान्य द्वितीय श्रेणीचे डबे असे एकूण २२ डबे असतील.

तसेच दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड येथून दर शनिवारी सुटणाऱ्या तिरुपती विशेष गाडीच्या मार्गात बदल करून करीमनगर, वरंगल, विजयवाडा मार्गे चालविण्याचा निर्णय घेतला आहे.

गाडी क्रमांक ०७०१५ हजूर साहिब नांदे– तिरुपती विशेष गाडी दि. २, ९, १६, २३ आणि ३० ऑगस्ट रोजी नांदेड येथून दर शनिवारी दुपारी ४.५० वाजता सुटेल आणि मुदखेड, बासर, निझामाबाद, लिंगापेट जागीत्याल, करीमनगर, पेद्दापल्ली, जम्मिकुंता, वरंगल, महेबुबाबाद, दोर्नाकाल, खम्मम, मधीरा, कोंडापल्ली, विजयवाडा, तेनाली, चीराला, ओंगोल, नेल्लोर, गुडूर, रेणीगुंठा मार्गे तिरुपती येथे रविवारी सकाळी ११.३० वाजता पोहोचेल.

गाडी क्रमांक ०७०१६ तिरुपती ते हजूर साहिब नांदेड विशेष गाडी तिरुपती येथून दि. ३, १०, १७, २४ आणि ३१ ऑगस्ट रोजी दर रविवारी रात्री १९.४५ वाजता सुटेल आणि आलेल्या मार्गानेच म्हणजे करीमनगर, वरंगल, विजयवाडा मार्गे हजूर साहिब नांदेड येथे सोमवारी दुपारी १६.०० वाजता पोहोचेल. या विशेष गाड्यांमध्ये २ एसी, ३ एसी, स्लीपर आणि सामान्य द्वितीय श्रेणीचे एकूण १८ डबे असतील.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

# अंमलबजावणीचे काय?

शिक्षण हे कोणत्याही समाजाचा पाया असतो. परंतु गेल्या काही वर्षांत महाराष्ट्रातील शिक्षण क्षेत्रात 'शिक्षण' ही संकल्पना बाजूला पडून 'व्यवसाय' म्हणून अधिक बळकट होत चालली आहे. विशेषतः खासगी शाळा, महाविद्यालये व शिकवणी वर्गांनी विद्यार्थ्यांच्या पालकांकडून अत्याधिक शुल्क आकारून शिक्षणाचे व्यापारीकरण केले आहे. या पार्श्वभूमीवर राज्याचे शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी शैक्षणिक शुल्क अधिनियमात सुधारणा करण्याचा घेतलेला निर्णय अत्यंत आवश्यक, योग्य आणि काळाची गरज आहे. राज्यातील अनेक शाळा आणि महाविद्यालये दरवर्षी विविध कारणे पुढे करून शुल्कामध्ये मनमानी वाढ करत आहेत. 'क्रीडा सुविधा', 'सांस्कृतिक उपक्रम', 'तांत्रिक सुधारणा', 'डिजिटल शिक्षण' अशा आकर्षक नावाखाली हजारो रुपयांची अतिरिक्त वसुली केली जाते. वास्तविक पाहता या सुविधांचा दर्जा अत्यंत सामान्य असतो. पालकांना ना या खर्चाचे पारदर्शक विवरण दिले जाते, ना त्यांच्या संमतीची गरज समजली जाते. त्यामुळे आर्थिकदृष्ट्या मध्यमवर्गीय व श्रमिक वर्गाच्या कुटुंबांवर शिक्षणाचा खर्च प्रचंड ताण आणतो आहे. काही शैक्षणिक संस्थांमध्ये तर संगनमताचे प्रकार आणि शिकवणी वर्गांचे साम्राज्य चालू असल्याचे दिसून येते. शिक्षणमंत्री भुसे यांनी स्वतः मान्य केले आहे की, काही खासगी महाविद्यालये संगनमत करून विद्यार्थ्यांना शिकवणी वर्गांमध्ये जबरदस्तीने प्रवेश घेण्यास प्रवृत्त करतात. महाविद्यालयीन शिक्षण अपूर्ण आणि अपारदर्शक पद्धतीने दिले जात असल्यामुळे विद्यार्थ्यांना परीक्षा व अभ्यास-क्रमासाठी शिकवण्या अनिवार्य वाटतात. कारण ह्या विद्यार्थ्यांना आणि पालकांना शाळा-महाविद्यालयातील शिक्षकांवर विश्वास वाटत नाही. त्यामध्ये शिक्षक देखील तेवढेच दोषी आहेत. त्यामुळे एका विद्यार्थ्यासाठी महाविद्यालयाचे शुल्क भरल्यानंतर पुन्हा शिकवणीसाठी स्वतंत्र शुल्क भरावे लागते. ही दुहेरी लूट थांबवणे शासनाचे प्राथमिक कर्तव्य असले पाहिजे. म्हणूनच कायद्यातील त्रुटी सुधारण्याची गरज निर्माण झाली आहे. 'महाराष्ट्र शैक्षणिक शुल्क नियमन अधिनियम' हे कायद्यातील सध्याचे प्रमुख साधन असले तरी त्यातील त्रुटींमुळे अनेक शैक्षणिक संस्था त्याचा गैरफायदा घेत आहेत. शुल्क वाढीसाठी स्थापन करण्यात आलेल्या शाळा व पालक प्रतिनिधींच्या समित्यांचे अस्तित्व अनेक ठिकाणी केवळ नावापुरते आहे. तसेच नियमांमध्ये भांडवलशाही मानसिकतेला अटकाव घालणाऱ्या कठोर तरतुदींचा अभाव आहे. त्यामुळे भुसे यांनी सांगितल्याप्रमाणे कायद्यात सुधारणा करून त्यात स्पष्टता, कठोर अंमलबजावणी व पारदर्शकता आणणे अत्यंत आवश्यक आहे. असे असले तरी जनतेची अपेक्षा आहे की, सुधारणा म्हणजे केवळ घोषणा नको. अशा प्रकारच्या घोषणा अनेक वेळा करण्यात आल्या आहेत. जसे काही वर्षांपूर्वी शाळा-महाविद्यालयांमध्ये बायोमेट्रिक पद्धतीने विद्यार्थ्यांची उपस्थिती अनिवार्य करण्याचा फतवा काढण्यात आला, परंतु नंतर कुठं पाणी मुरलं माहीत नाही, त्याची अंमलबजावणी झालीच नाही आणि खाजगी शिकवणी वर्गांचे धंदे चालूच राहिले. आताही असं होणार नाही याची काय शाश्वती आहे? परंतु शिक्षणमंत्री भुसे यांनी केलेली घोषणा स्वागतार्ह आहे. त्यामुळे ही सुधारणा फक्त राजकीय निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर गाजावाजा करणारी आश्वासने नसावी. कायद्यातील बदलांचा मसुदा तयार करून तो सार्वजनिक चर्चेसाठी सादर करणे, पालक संघटनांचे मत घेणे, आणि सर्व पक्षीय सहमतीने तो पारित करणे गरजेचे आहे. होऊ घातलेल्या कायद्याची पूर्णपणे अंमलबजावणी करायची असेल तर काही ठोस उपाय करणे गरजेचे आहे. जसे शिक्षण संस्थांसाठी शुल्क निर्धारणाची पारदर्शक प्रक्रिया अनिवार्य करणे, प्रत्येक शाळेच्या वेबसाइटवर खर्चाचा खुलासा करणे सक्तीचे करणे, शिकवणी वर्गांवरील नियंत्रणासाठी स्वतंत्र धोरण तयार करणे, शिकवणी वर्गांमधील शिक्षकांची पात्रता, शुल्क व अभ्यासक्रम यावर नियंत्रण आणि शाळा-पालक प्रतिनिधी मंडळांना कायदेशीर बळ व प्रशिक्षण देणे. शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी आर्थिक योगदान आवश्यक असले तरी, त्याची जबरदस्ती व व्यापारीकरण समाजघातक आहे. गरीब व मध्यमवर्गीय कुटुंबांतील विद्यार्थीही गुणवत्तापूर्ण शिक्षण घेण्याचे स्वप्न बघतात. परंतु सध्याची शैक्षणिक यंत्रणा त्यांना केवळ खर्चाचे ओझे देत आहे. त्यामुळे शिक्षणाचा अधिकार सर्वांसाठी सुलभ करायचा असेल तर सरकारने तातडीने आणि प्रभावीपणे या सुधारणा लागू कराव्यात. अन्यथा शिक्षणाचा हेतूच हरवेल आणि त्याचा फायदा केवळ मोजक्या संस्थाचालकांच्या खिशात जाईल.



# लॉर्ड्सचा बखरनामा

कळविण्यास अत्यंत दुःख होत आहे की लॉर्ड्सच्या रणभूमीवर झालेल्या निकराच्या लढाईत भारतीय संघ धारा-तीर्थी पडला असून इंग्लंड संघाने मालिकेत २/१ अशी बढत घेतली आहे. दुसरा कसोटी सामना जिंकून भारतीय संघाला आपल्या क्रिकेट प्रेमींच्या हृदयासोबतच फुफ्फुस किडनी आतडे जिंकायची नामी संधी होती परंतु वारंवार विजयश्रीला अव्हेरणे भारतीय संघाला महाग पडले आणि हातातोंडाशी आलेल्या विजयाला मुकावे लागले. गोलंदाजांच्या मेहनतीला कधी क्षेत्ररक्षकांनी तर कधी फलंदाजांनी साथ न दिल्याने पहिल्या कसोटी प्रमाणे तिसऱ्या कसोटीतही आपल्या संघावर पराभवाची नामुष्की आली आहे.

झाले काय तर दोन्ही संघाने प्रत्येकी एक एक सामना जिंकल्याने मालिकेतली रंगत वाढली होती. त्यातही तिसरा सामना प्रसिद्ध लॉर्डस मैदानावर असल्याने त्याला आणखी ग्लॅमर प्राप्त झाले होते.

मागील दोन लढतींचा अनुभव लक्षात घेता बेन स्टोक्सने चतुराईने प्रथम फलंदाजी पत्करली. पहिल्या दिवशी लॉर्ड्चे उत्साही वा-तावरण, हिरव्याकंच नैसर्गिक आवरणा-तील मंद मंद खेळपट्टी जणुकाही मंदाकिनी सारखी गुबगुबीत. गच्च भरलेले मैदान, लक्षणीय प्रेक्षणीय चढउतार! ना फलंदाजांवर मोहीत ना गोलंदाजांच्या प्रेमात. हाच तोरा या पीचने पहिले तीन दिवस दोन्ही संघांना दाखवला, जे काही करायचे आहे ते तुम्ही करा. कारण स्पष्ट होते, मेरेही पास तुझे आना है, तेरेही पास मुझे जाना है.

खेळपट्टीचा अंदाज घेऊन इंग्लिश संघाने बॅझबॉलला तिलांजली देत चक्क संथबॉल खेळी केली. विशेषतः दुसऱ्या दिवशी बुमराहच्या स्विंग, सिमने इंग्लिश तंबूत वादळ निर्माण केले पण पुन्हा एकदा चेंडू बदलल्याने आपल्या गोलंदाजांना त्याचा फटका बसला. तरीही इंग्लंडला २७१/७ रोखण्यात यश आले होते. पण पुन्हा एकदा आपला संघ इंग्लंड संघाला चिरडण्यात अपयशी ठरला. जणुकाही इंग्लंड संघ क्रश असल्यासारखे आपले गोलंदाज, क्षेत्ररक्षक त्यांच्यावर भाळले आणि शेपटाने ११६ धावा जोडून धापा टाकणार्या संघाला चारशेच्या जवळपास घेऊन गेले.

इंग्लंडची धावसंख्या फुगल्याने आपल्या संघाला कमीतकमी १०० धावांची आघाडी घेणे गरजेचे होते आणि आपली वाटचालही तशीच सुरू होती. विशेषत: राहुलच्या शतकाने आपल्या आशा पल्लवित झाल्या होत्या पण पुन्हा एकदा आपल्या फलंदाजीला शिघ्रपतनाने ग्रासले. जिथे इंग्लंड संघाने २७१/७ ते सर्वबाद ३८७ अशी झेप घेतली, तिथे आपण ३७६/६ ते सर्वबाद ३८७ असे गळपटलो. ना आघाडी मिळाली ना सामन्यात वरचढ होता आले. दोन्ही संघांनी सारखीच धावसंख्या रचल्याने तिथे आजा मेला नातू झाला हिशोब बरोबर झाला अशी स्थिती होती. पहिले तीन दिवस निकालाच्या दृष्टीने वांझोटे ठरले होते.

मात्र तिसऱ्या दिवशी शेवटच्या सत्रात झॅक क्राऊलीने खोडसाळपणा केल्याने भारतीय संघ खवळला आणि तिथे एकदम से वक्त बदल दिये, जज्बात बदल दिये, जिंदगी बदल दिये, हालात बदल दिये अशी परिस्थिती निर्माण झाली. साध्या वरणासारखी भासणारी कसोटी अच-ानक दाल तडका वाटू लागली. भारतीय संघात तिसऱ्या दिवसाअखेर ड्रीनॅलीन रश निर्माण झाले आणि त्याचा फटका इंग्लंड संघाला चौथ्या दिवशी बसला. भरीस भर म्हणून पीच गोलंदाजांकडे आकृष्ट झाली. स्विंग आणि बाऊंसने फलंदाजांची भंबेरी उडविली. विशेषतः सिराजने तिखट मारा करून इंग्लंडला गळती लावली तर वॉशिंग्टनने सुंदर मारा करत बुमराहच्या साथीने इंग्लंडला १९२ धावांत गुंडाळले.

लॉर्ड्सवर तिरंगा फडकवण्यासाठी टीम इंडियाला फक्त १९३ धावा हव्या होत्या मात्र पीच ची स्थिती पाहता अब तेरा क्या होगा कालिया अशी मनात शंकेची पाल चुकचुकत होती आणि झा-लेही तसेच. पहिल्या तीन दिवसात २० बळी घेणाऱ्या खेळपट्टीवर चौथ्या दिवशी तब्बल १४ फलंदाज प्राणास मुकले. पाचव्या दिवशी राहुल, पंत या अस्सल फलंदाजांवर आणि अष्टपैलू जडेजावर संघाची भिस्त होती. तर नितीश रेड्डी आणि वॉशिंग्टन सुंदर हे दोन्ही नवोदित खेळाडू अष्टपैलू असले तरी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सध्यातरी ते रॉ मटेरियल आहेत, त्यांचे फिनिश्ड प्रॉडक्ट मध्ये रूपांतर व्हायला वेळ लागणार. त्यामुळे या तिन्ही फलंदाजांचा कस लागणार होता.


मात्र जडेजाने एकाकी अपयशी झुंज दिली. भलेही बुमराह आणि सिराजने मिळून तब्बल १४ षटके खेळपट्टीवर पाय रोवून फलंदाजी करत जडेजाला साथ दिली परंतु चौथ्या डावात १९३ चा गोवर्धन उचलण्यासाठी टॉप ऑर्डरला मेहनत घ्यावी लागणार होती, जी त्यांनी नाही घेतली. असहायपणे आशाळभूत होऊन आपण बुमराह सिराजकडे धावांसाठी डोळे लावून बसलो. खरेतर हे चुकीचे होते, बैलाकडून दुधाची अपेक्षा करण्यासारखे होते. चौथ्या दिवशी ड्रीनॅलीन रश झालेल्या आपल्या संघाला १९३ चे लक्ष्य गाठतांना फलंदाजीत टेस्टेस्टेरॉनची निकड होती आणि त्याची जबाबदारी राहूल जडेजासह यशस्वी जैस्वाल, करुण नायर, कर्णधार गील आणि पंत यांची होती.

असे म्हणतात की विजयाला अनेक बाप असतात तर पराजय हा पोरका असतो, अनाथ असतो. तरीही फलंदाजीत जैस्वाल, करूण नायरचे अपयश ठळकपणे जाणवते. करूण नायर तर जणुकाही स्पिड गव्हर्नर लावल्यासारखा पन्नाशी ओलांडत नाही. तर पंतचा खेळ, त्याचे धावबाद होणे संघासाठी दुर्दैवी ठरले. सलामीला जैस्वालला जोफ्रा आर्चरने दोन्ही डावात सहज गिळले तर इंग्लंडने पहिल्या डावात गील चे फुटवर्क रोखतांना विकेट किपरला वर आणून त्याची नाकाबंदी करून टाकली होती. तसेच त्यांनी दुसऱ्या डावात पंत फटकेबाजी करू शकणार नाही अशा प्रकारे गोलंदाजी आणि क्षेत्ररक्षण लावले. मुख्य म्हणजे आपण पहिल्या डावात ३१, दुसऱ्या डावात ३२ अवांतर धावा देत स्वतःसाठी खड्डा खोदला होता.

थोडक्यात काय तर चौथ्या डावात आपल्या फलंदाजांचा अग्नीपरिक्षा होती, ज्यात ते खरे नाही उतरले. तर पहिल्या डावात इंग्लंडला लवकर गुंडाळण्यात आपण अपयशी ठरलो. पहिल्या डावात आपल्या क्षेत्ररक्षकांची गचाळ कामगिरी, दोन्ही डावातल्या अतिरिक्त ६३ धावा ह्या चुका टीम इंडीयाच्या पराभवास कारणीभूत ठरल्या. तर केएल राहुल-चे शतक, जडेजाचे फायटींग स्पिरिट, सिराज बुमराह जोडीची तुफानी गोलंदाजी ह्या प्लस पॉईंट ठरल्या. तर बेन स्टोक्स कर्णधार म्हणून गील पेक्षा उजवा ठरला. जोफ्रा आर्चरने तो कसा खास गोलंदाज आहे हे त्याच्या वेगवान आणि अचानक उसळत्या चेंडूने दाखवून दिले. इंग्लंड गोलंदाजांचे झपकन आत येणारे चेंडू भारतीय फलंदाजांना खेळणे अवघड होते. दुर्दैवाने भारतीय संघाला चौथ्या दिवशी संध्याकाळी आणि शेवटच्या दिवशी फलंदाजी करावी लागली, तेव्हा खेळपट्टी पूर्णपणे गोलंदाजीला अनुकूल होती, हा मुद्दा सुद्धा तेवढाच जय पराजयावर परिणामकारक ठरला.

**-अनिल पावशेकर**
नागपूर
मो. ९८२२९३९२८७

# सुपरस्टार राजेश खन्ना



हिंदी चित्रपट सृष्टीतील पहिले सुपरस्टार म्हणून ओळखले जाणारे जेष्ठ अभिनेते राजेश खन्ना यांची आज दहावी पुण्यतिथी. राजेश खन्ना यांचा जन्म २९ डिसेंबर १९४२ रोजी पंजाबमधील अमृतसर येथे झाला. राजेश खन्ना यांचे मूळ नाव जतीन खन्ना असे होते. त्यांच्या आईचे नाव चंद्राणी खन्ना तर वडिलांचे नाव लाला हिराणी असे होते. त्यांचे वडील शाळेत मुख्याध्यापक होते. त्यांच्या एका जवळच्या नातेवाईकांना मुलबाळ नव्हते म्हणून त्यांच्या आई वडिलांनी त्यांना त्या नातेवाईकांकडे दत्तक दिले. त्यांच्या नवीन आईचे नाव लीलावती खन्ना तर वडिलांचे नाव चुनीलाल खन्ना असे होते.

चुनीलाल खन्ना रेल्वे कंत्राटदार होते. ते मुंबईत राहत होते. राजेश खन्ना हे सेंट सबिस्टाईन गॉन हायस्कूल येथे शिकत असताना त्यांची रवी कपूर यांच्याशी ओळख झाली. रवी कपूर म्हणजेच हिंदी चित्रपट सृष्टीतील प्रसिद्ध अभिनेते जितेंद्र. राजेश खन्ना व जितेंद्र यांनी कॉलेज जीवनात अनेक नाटकात एकत्र काम केले. नंतर उच्च शिक्षण घेण्यासाठी राजेश खन्ना हे पुण्यात आले. पुण्यात दोन वर्ष शिक्षण घेतल्यावर ते पुन्हा मुंबईला परतले. मुंबईत काही दिग्दर्शकांनी टॅलेंट हंट स्पर्धा आयोजित केली. राजेश खन्ना यांच्या काकांनी त्यांचे नाव या स्पर्धेकरिता नोंदवले. ते नोंदवताना त्यांनी त्यांचे नाव जतीन खन्ना ऐवजी राजेश खन्ना म्हणून नोंदवले पुढे याच नावाने ते ओळखले जाऊ लागले. या स्पर्धेत त्यांनी पहिल्या क्रमांकाचे पारितोषिक मिळवले त्यांच्या अभिनयाने त्याकाळातील दिग्गज दिग्दर्शक प्रभावित झाले.

१९६६ साली चेतन आनंद यांनी त्यांना आखरी खत या चित्रपटात संधी दिली हाच त्यांचा पहिला चित्रपट. हा चित्रपट ऑस्करला गेला होता. पहिल्याच चित्रपटातील त्यांच्या अभिनयाने चित्रपट रसिक तसेच जाणकार प्रभावित झाले त्यामुळे त्यांना अनेक चित्रपट मिळाले. त्याकाळातील यशस्वी दिग्दर्शक असणारे शक्ती सामंत यांनी त्यांना आराधना या चित्रपटात नायकाची भूमिका दिली. या चित्रपटात शर्मिला टागोर या त्यांच्या नायिका होत्या. चित्रपट सुपरहिट झाला. या चित्रपटातील सर्व गाणी लोकप्रिय झाली. या चित्रपटा नंतरच राजेश खन्ना सुपरस्टार म्हणून ओळखले जाऊ लागले. राजेश खन्ना यांची अदाकारी, संवाद फेकीची लकब यावर तरुणाई फिदा झाली.

विशेषतः कॉलेज मधील मुली त्यांच्यावर जीव ओवाळून टाकू लागल्या. त्यांचे चाहते त्यांच्या गाडीचे चुंबन घ्यायचे. मुली त्यांच्या गाडीची धूळ आपल्या भांगेत भरत. बऱ्याचश्या मुलींनी त्यांच्या फोटोशी लग्न केले होते. त्यांना चाहत्यांचे जितके प्रेम लाभले तितके प्रेम कोणत्याच कलाकाराला लाभले नाही. राजेश खन्ना यांचे सलग १५ चित्रपट सुपरहिट झाले हा एक विक्रम आहे. तो अजूनही कोणत्या अभिनेत्याला तोडता आला नाही. शर्मिला टागोर, मुमताज, अशा पारेख, तनुजा यांच्याशी त्यांची चांगली केमिस्ट्री जमली. सत्तरच्या दशकात राजेश खन्ना सुपरस्टार पदावर आरूढ झाले होते. चालण्या बोलण्याची विशिष्ट ढब, मानेला खास झटका देत, हातवारे करत नाचण्याची अनोखी शैली, जबरदस्त संवाद फेक आणि ओठावर रुंजी घा-लतील अशी गाणी यामुळे राजेश खन्ना हे अफलातून रसायन बनून गेले. त्याकाळात सर्वाधिक मानधन घेणारे राजेश खन्ना यांची प्रेम प्रकरणेही गाजली पण १९७३ साली त्यांनी आपल्या पेक्षा कितीतरी लहान वयाच्या डिंपल कपाडिया यांच्याशी विवाह केला. १९९२ साली काँग्रेसच्या वतीने त्यांनी दिल्ली मतदार संघातून लोकसभेची पोटनिवडणुक लढवली आणि ते खासदार म्हणून निवडून आले. १८ जुलै २०१२ रोजी राजेश खन्ना यांनी चाहत्यांना अलविदा म्हणत जगाचा निरोप घेतला आणि बॉलिवूडचा पहिला सुपरस्टार काळाच्या पडद्याआड गेला.

बाबूमोशाय....... बाबू मोशाय जिंदगी और मौत उपरवाले के हात है जहाँपणा...जिसे ना तो आप बदल सकते है ना मै.... हम सब तो रंगमंच की कटपुतलीया है, जीसकी डोर उपरवालेकी उंगलीओमे बंधी है....कब कोण कैसे उठेगा कोई बता नहीं सकता..... आनंद कभी मरते नहीं वह हमेशा याद रहते है.... we all miss you.....


राजेश खन्ना यांना विनम्र अभिवादन!

**-श्याम ठाणेदार**
दौंड जिल्हा पुणे
मो. ९९२२५४६२९५

# जिंदगी लंबी नही बडी होनी चाहिये!

एकेकाळी संपूर्ण हिंदी चित्रपटसृष्टी व्यापून टाकणारे, बॉलीवूडचे पहिले सुपरस्टार, चाहत्यांमध्ये 'काका' या नावाने ओळखले जाणारे अभिनेते, निर्माते आणि माजी खासदार राजेश खन्ना यांचा १८ जुलै हा स्मृतिदिन. सुमारे १७० हून अधिक चित्रपटातून विविध भूमिका साकारणाऱ्या राजेश खन्ना यांनी १९६९ ते १९७२ या कालावधीमध्ये सलग १५ सुपरहिट चित्रपट देण्याचा विक्रम केला. त्यामुळेच त्यांना हिंदी चित्रपटसृष्टीचा पहिला सुपरस्टार मानले जाते. आराधना, हाथी मेरे साथी, आनंद , अमरप्रेम आदी गाजलेल्या चित्रपटातील त्यांच्या भूमिकांमुळे ते रसिकांच्या कायम स्मरणात राहतील. उजव्या हाताच्या दोन बोटांनी हवेत हातवारे करीत हळूच मान तिरकी करून किंचीत डोळे मिटण्याची त्याची लकब आजही अनेकांना भुरळ घालते.

१८ जुलै हा हिंदी चित्रपटसृष्टीचा पहिला सुपरस्टार राजेश खन्नाचा स्मृतिदिन. २९ डिसेम्बर १९४२ ला अमृतसरला जन्मलेल्या राजेश खन्नाने (मूळ नाव जतीन खन्ना) १९६६ मध्ये 'आखरी खत' या चित्रपटाद्वारे



रुपेरी पडद्यावर पदार्पण केले. तथापि, १९६९ ला प्रदर्शित झालेल्या 'आराधना' या चित्रपटाने त्याला रात्रीत स्टार केले आणि त्यानंतर जवळजवळ दीड दशक त्याने हिंदी चित्रपटसृष्टीवर राज्य करताना लोकप्रियतेचे अत्युच्च शिखर गाठून 'सुपरस्टार' या पदाला जन्म दिला. आपल्या मोहक अदांनी आणि भावोत्कट अभिनयाने लाखो तरूण-तरुणींच्या गळ्यातील ताईत बनलेल्या राजेश खन्नाने सुमारे १७० हिंदी चित्रपटांतून भूमिका साकारताना मुमताज, आशा पारेख, हेमामालिनी, वहिदा रेहमान, शर्मिला टागोर आदी नायिकांसोबत अनेक लोकप्रिय गीतांना जन्म दिला. विशेषतः मुमताज बरोबर त्यांची जोडी भलतीच जमली. केवळ हिंदी चित्रपटातच नव्हे तर एकूणच भारतीय चित्रपटातील यशस्वी आणि आकर्षक जोडीचा विचार केल्यास राजेश-मुमताज जोडीला मानाचे आणि वरचे स्थान असेल. राजेश-मुमताज जोडीचे दो रस्ते, बंधन, अपना देश, सच्चा झूठा, दुश्मन, आप की कसम, रोटी आणि आयना असे आठ चित्रपट खूपच गाजले.

आजही गाजलेल्या हिंदी गाण्यांच्या यादीत राजेश खन्ना- किशोरकुमार- आर.डी.बर्मन या त्रिकुटाचे स्थान वरचे आहे. सुपरस्टार राजेश खन्ना यांच्यावर चित्रित झालेल्या गीतांमध्ये मैने तेरे लिये, गुलाबी ऑखे, जिंदगी का सफर, जिस गली मे तेरा घर ना हो बालमा, जिंदगी कैसी हे पहेली, इतना तो याद है मुझे, हमे तुमसे प्यार कितना, मेरे नैना सावन भादो, गोरे रंग पे ना इतना गुमान कर, वो शाम कुछ अजीब थी, यूही तुम मुझसे बात करती हो, शायद मेरे शादी का खयाल, कही दूर जब दिन ढल जाये, मेरे सपनोकी रानी, छुप गये सारे नजारे, सच्चाई छुप नही सकती, मेरी प्यारी बहेनिया, प्यार दिवाना होता है, जय जय शिव शंकर आदी गाणी आजही रसिकांच्या मनात रुंजी घालतात. भारतातील लाखो तरुणींच्या दिलाची जसा तो धडकन होता तसे त्या काळातील तरुणांना त्याच्या लकबींनी आणि फॅशन ने अक्षरशः वेड लावले होते. तरुणी त्याला आपल्या रक्ताने पत्र लिहित असत तर तरूण त्याच्या केशरचनेचे दिवाने होते. सशाच्या कानासारखी लांब कॉलर असलेला शर्ट (गुरु शर्ट) असो किंवा वेगवेगळे सफारी असोत तरूण त्याचेच अनुकरण करत. लग्नामध्येही त्याकाळी सफारी लोकप्रिय झाली होती. रुपेरी दुनियेत आपल्या कर्तुत्वाने अढळ स्थान मिळविणे आणि रातोरात सुपरस्टार झाल्यावर तिथे टिकून राहणे हे त्याहून अवघड. मात्र राजेश खन्नाने हे मिळविले आणि ते फारच कमी लोकांना मिळते. त्यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांना विनम्र आदरांजली !

**-प्रा. व्ही. व्ही. कोष्टी,**
शिपूर, जि. सांगली

# मुलांना लागला मोबाईलचा लळा

पूर्वीच्या काळी उन्हाळ्याच्या सुट्ट्यामध्ये मुले मामाच्या गावी जात असत आता मात्र शैक्षणिक बदलामुळे उन्हाळ्याच्या सुट्टीतही विविध परीक्षा घेतल्या जात आ-हेत त्यात ऑनलाइन अभ्यासक्रम आणि परीक्षा मुळे मुलांच्या हाती अपसुकच मोबाईल आले आहेत.

मोबाईल मुळे मुलांना कायम स्क्रीन पाहण्याचे व्यसन जडले आहे. मुले दिवसभर मोबाईलवर ऑनलाइन गेम खेळण्यात तसेच विविध रिल्स पाहण्यात मग्न असतात. कॅम्पुटर व स्मार्टफोन मुळे लागलेल्या लळ्यामुळे उन्हाळ्याच्या सुट्टीतले मामाचे गाव हरवले आहे. जुने व पारंपारिक खेळ यामुळे शारीरिक व मानसिक वाढ होण्यास मदत होत होती ते खेळ सुद्धा आता हद्दपार झाल्याचे चित्र सध्या ग्रामीण व शहरी अशा दोन्ही भागात दिसून येत आहे. स्मार्टफोन येण्यापूर्वी उन्हाळ्याच्या सुट्टीत बच्चेकंपनी मामाच्या गावची प्रती-क्षा करायची सुट्टी लागताच, मैदाने गच्च भरून जायची. कबड्डी,खो-खो, भोवरा, गोट्या, चेंडू, विटी दांडू,दोरीवरच्या उड्या, लगोरी, कावळ्यांचा खेळ, बाहुला बाहुलीचे लग्न असे अनेक खेळ खेळले जायचे. चिंच,कच्चा कैऱ्या, जांभळे, आंबे, पेरू शेतातील वेगवेगळ्या रानमेवा मनसोक्त खाणे व मनसोक्त फिरणे असा धमाल दिवस कधी निघून जायचा हे कळत सुद्धा नसे परंतु बदलत्या काळात स्मार्टफोनच्या जमान्यात मामाचे गाव पोर-के झाले आहे. स्नेहभाव प्रकट करायलाही कुणाकडे वेळच नाही पारंपारिक खेळाकडे मुलांनी दुर्लक्ष केल्याने गावरान व अस्सल खेळाचे अस्तित्व आता संपून जात आहे.

पूर्वी शाळेला सुट्ट्या लागल्याबरोबर मुले मामाच्या गावाला जात होती आता मात्र मोबाईलच्या नादात मुलेमुली तासन-तास घरामध्ये एका ठिकाणी बसून रा-हतात मुले अजिबात बाहेर पडत नाहीत. आता घरातील सध्या खूपच वाईट स्थिती म्हणजे, सर्वजण घरात आहेत पण प्रत्येक



जण एकटा आहे जो तो आपल्या मोबाईल मध्ये मान खूपसून बसला आहे, हे चित्र पाहिले की अतिशय वाईट वाटते एकूणच विद्यार्थ्यांना नात्यातील स्नेहभाव, प्रेम, आपलेपणा प्रकट करण्यास देखील वेळ राहिला नाही शहरासह खेडेगावातील कौटुंबिक सामाजिक स्थिती देखील बदल-लेली आहे.

सध्या शहर व ग्रामीण भाग या दोन्ही-मध्ये एकसारखे चित्र दिसून येते ते म्हणजे मुले स्मार्टफोनमध्ये कायम गुंतलेली दिसून येतात स्मार्टफोनचा वॉच टाईम जास्त झाल्याने मुलांच्या डोळ्यावरही त्याची वाईट परिणाम दिसून येत आहेत. काही मुलांना तर लहानपणीच म्हणजे आठ ते दहा वर्षे होईपर्यंतच जाड भिंगाचे चष्मे आपल्याला दिसून येतात तसेच भरपूर मुलांची शरीराची जी वाढ व्हायला हवी ती होताना दिसून येत नाही कारण मुले एकाच वेळी जेवण पण करतात मोबाईल तर बघतात किंवा टीव्ही तर बघतात एकाच वेळी दोन कामे केल्याने त्यांचे जेवणावर लक्ष नाही त्यामुळे जेवण अंगाला काही लागतच नाही. तसेच वारंवार टीव्ही किंवा मोबाईल पाहिल्यामुळे पाठीला बाक येणे,हातपाय दुखणे, हात पायाला मुंग्या येणे, बधीरपणे तेच ते चित्र कायम पहात बसणे स्वमग्न होणे अशा शारीरिक समस्या कायमच उद्भवत आहेत.

या मोबाईल समस्येवर आपण लवकरात लवकर जर उपाय नाही शोधला तर आपले काही खरं दिसत नाही, मुलांना मैदानी खेळाकडे वळवा पालकांनी सुद्धा मैदान जवळ केलं पाहिजे तसेच दर रविवारी घरामध्ये मोबाईलचा उपवास करावा, आठवड्यातून एक दिवस कोणीही मोबाईलला हात लावणार नाही असे ठरवावे. तसेच जेवण करत असताना मोबाईल कोणीही पाहणार नाही असा अलिखीत नियम आपल्या घरामध्ये असावा जास्तीत जास्त मुलांच्या शारीरिक, मानसिक, भौतिक विकास होईल याकडे वारंवार लक्ष द्यावे वरील उपाय आपल्याला सहज करता येतील.

**-सूर्यकांत दासरवार**
जि.प.प्रा.शा. अंबुलगा (बु.)
ता. मुखेड, जि. नांदेड

## थोडक्यात...

### ग्रामपंचायत अधिकारी पी.डब्ल्यू. भदरगे रुजू

**नवीन नांदेड (प्रतिनिधी) –** तालुक्यातील गोपाळचावडी ग्रामपंचायत येथे ग्रामसेवक पी.डी उबाळे कार्यरत होते. त्यांची



बदली मुदखेड पंचायत समिती येथे झाल्यामुळे त्यांच्या रिक्त झालेल्या जागेवर ग्रामपंचायत अधिकारी पी.डब्ल्यू भदरगे रूजू झाले आहे.

भदरगे हे यापूर्वी नांदेड तालुक्यातील सिद्धनाथ ग्राम पंचायत येथे गेल्या पाच वर्षांपासून कार्यरत होते. भदरगे यांनी पदभार स्वीकारला असून त्यांचे उपसरपंच साहेबराव पाटील सेलूकर, ग्रामपंचायत सदस्य प्रतिनीधी अनिल पाटील धमने, सरपंच प्रतिनिधी प्रदिप लाखे, ग्रामचायत लिपीक आर्शिवाद डाकोरे आदींनी शाल, श्रीफळ देऊन स्वागत केले.

### वीरशैव गवळी समाजाच्या मुदखेड अध्यक्षपदी श्याम चंद्रे



**मुदखेड (प्रतिनिधी)–** वीरशैव गवळी समाजाच्या मुदखेड अध्यक्षपदी श्याम चंद्रे, उपाध्यक्षपदी बाळू चंद्रे तर सचिवपदी रामदास होळकर यांची निवड करण्यात आली.

वीरशैव गवळी समाज बांधवांच्यावतीने नुकतेच बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी सर्वानुमते वीरशैव गवळी समाजाची कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. यावेळी फलाजी शेवटे, केदारनाथ शेवटे, अविनाश झमकडे, विश्वनाथ कानबाले, विजय होळकर, भिवाजी झाडे, अभय बल्ल्याने, सुभाष चंद्रे आदी समाज बांधवांनी ही निवड केली आहे.

# स्वारातीम विद्यापीठाचा नासकॉम आणि स्किल फॅक्टरीसोबत सामंजस्य करार

## १.५ लाख विद्यार्थ्यांना मिळणार फायदेशीर संधी –कुलगुरु डॉ. मनोहर चासकर

**नांदेड (प्रतिनिधी)–** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांनी दि.१६ जुलै रोजी नासकॉम आणि स्किल फॅक्टरी लर्निंग प्रा. लि., पुणे यांच्यासोबत सामंजस्य करार केला. उद्योग-शैक्षणिक सहकार्य अधिक बळकट करून कौशल्य विकासाला चालना देण्याच्या हेतूने झालेल्या या करारामुळे विद्यापीठाच्या सुमारे ४०० संलग्न महाविद्यालयांतील १.५ लाखाहून अधिक विद्यार्थ्यांना थेट लाभ मिळणार आहे, असा विश्वास स्वारातीम विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी व्यक्त केला.

या सामंजस्य करारांतर्गत डिजिटल १०१ - ३० तासांचा (एसटीईएम व नॉन-एसटीईएम) अभ्यासक्रम, मोफत इंटर्नशिप व अपरेंटिसशिप संधी, उद्योग-आधारित प्रशिक्षण व प्लेसमेंटसाठी थेट संपर्क आणि आधुनिक नोकरी बाजारासाठी आवश्यक कौशल्य विकास या सुविधा विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध होणार आहेत.



कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांमध्ये प्रमुख उपस्थिती विद्यापीठाचे कुलगुरु प्रा. डॉ. मनोहर चासकर, नासकॉमच्या सीईओ डॉ. अभिलाषा गौर, सुश्री शीबा थॉमस, स्किल फॅक्टरी लर्निंग प्रा. लि., पुणेचे अमोल बागल, कुलसचिव डॉ. डी. डी. पवार, व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. प्रशांत पेशकर, नारायण चौधरी, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. एम. के. पाटील, वित्त व लेखा अधिकारी डॉ. पराग भालचंद्र, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. शैलेश वाढेर, आयक्यूएसीचे संचालक डॉ. बी. सुरेंद्रनाथ रेड्डी, कौशल्य विकास केंद्राचे समन्वयक डॉ. एस. जी. गट्टाणी, संगणकशास्त्रे संकुलाचे संचालक डॉ. जी. व्ही. चौधरी आणि जनसंपर्क अधिकारी डॉ. अशोक कदम यांची होती.

या कराराची वैशिष्ट्ये स्पष्ट करताना डॉ. एस. जी. गट्टाणी म्हणाले, हा करार विद्यार्थ्यांना उद्योगाशी थेट जोडेल आणि त्यांच्या रोजगार क्षमतेत लक्षणीय वाढ घडवेल.

कुलगुरु डॉ. मनोहर चासकर यांनी स्पष्ट केलं की, विद्यापीठाचे प्रमुख ध्येय विद्यार्थ्यांना प्रशिक्षित करून त्यांना दर्जेदार नोकऱ्यांसाठी सज्ज करणे आहे. ही भागीदारी त्यासाठी महत्त्वपूर्ण ठरेल. नासकॉमच्या प्रतिनिधी सुश्री शीबा थॉमस यांनी सांगितले की, आम्ही स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठासाठी प्रकल्पाधारित इंटर्नशिप, सीएसआर उपक्रम व उद्योग-शैक्षणिक साखळी प्रबळ करण्यासाठी पाठिंबा देऊ, असे ते म्हणाले.

कार्यक्रमानंतर झालेल्या चर्चासत्रात अभ्यासक्रम व उद्योगाच्या गरजांमध्ये समन्वय साधण्यावर भर देण्यात आला. नासकॉमकडून लवकरच कॅम्पस प्लेसमेंटसाठी विविध कंपन्यांशी संपर्क साधण्याचे आश्वासन देण्यात आले. कार्यक्रमाची सांगता डॉ. बी. सुरेंद्रनाथ रेड्डी यांनी आभार प्रदर्शनाने केली. ते म्हणाले, हा करार स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांसाठी नव्या संधी निर्माण करणारा आणि उद्योगांसाठी प्रशिक्षित मनुष्यबळ घडवणारा आहे.

# आपल्या समृद्ध वारश्याकडे चिकित्सकपणे पाहिले पाहिजे –प्रा. आशुतोष पाटील

**नांदेड (प्रतिनिधी)–** भारताचा ऐतिहासिक वारसा अतिशय समृद्ध आहे. पण तो व्यवस्थितरित्या समजून घ्यायचा असेल तर त्याकडे चिकित्सक वृत्तीने पहाणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन इतिहास आणि पुरातत्वशास्त्राचे उदयोन्मुख अभ्यासक आणि छत्रपती संभाजी नगरच्या एम.जी.एम. विद्यापीठातील इतिहासाचे सहाय्यक प्राध्यापक प्रा. आशुतोष पाटील यांनी येथे केले.



प्रा. नरहर कुरुंदकर यांच्या ९३व्या जन्म दिनानिमित्त नरहर कुरुंदकर प्रगत अध्ययन व संशोधन केंद्राच्या वतीने 'आपला वारसा समजून घेताना' या विषयावर व्याख्यान देताना ते बोलत होते.

हा वारसा आपल्या आजूबाजूला सर्वत्र आढळतो मात्र त्याची जाणीव होण्यासाठी समाजात कुतूहल असायला हवे असे त्यांनी यावेळी सांगितले. पुरातत्वशास्त्र, पुरातत्वीय शोध, मूर्तिशास्त्र आणि शिल्पशास्त्र यांचा स्लाईड्सच्या आधारे संदर्भ देत त्यांनी भूतकाळातील समाजांच्या जीवनशैलीतील अनेक रंजक पैलू उलगडून दाखवले. अनेक वेळा इतिहासाचा अन्वयार्थ लावण्यासाठी पुरातत्वीय पुरावा पुरेसा नसतो अशावेळी संशोधकाला किंवा अभ्यासकाला आपल्या कल्पनाशक्तीचा वापर करावा लागतो. मात्र कल्पनाशक्तीचा अतिरेक झाला तर त्यातून अवास्तव निष्कर्ष काढले जाण्याचा धोका आहे असे प्रा. पाटील यांनी उपस्थितांच्या निदर्शनास आणून दिले.

सध्याच्या काळात पुरातत्वीय शोधांचे राजकीयकरण होत आहे याबद्दल त्यांनी नाराजी व्यक्त केली. तसेच इतिहासाकडे एक ज्ञानशाखा किंवा अभ्यासशाखा म्हणून न पाहता रंजक मजकूर निर्माण करण्याचे साधन म्हणून पाहिले जात आहे. त्यामुळे इतिहासाचे गांभीर्य कमी होत असल्याची खंत प्रा. पाटील यांनी यावेळी व्यक्त केली.

प्रारंभी प्रा.दत्ता भगत यांनी स्वागत केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. श्रीनिवास पांडे यांनी केले तर सूत्रसंचालन आणि वक्त्यांचा परिचय डॉ. विश्वाधार देशमुख यांनी करून दिला. डॉ. अभय दातार यांनी आभार मानले.

यावेळी नरहर कुरुंदकर संशोधन केंद्राच्या शोधजागर या अनियतकालिकाच्या चौथ्या अंकाचे प्रकाशन प्रा. पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच केंद्राच्या वतीने दर वर्षी दोन संशोधनवृत्ती प्रदान करण्यात येतात. शेख नजीर मेहबूबशहा आणि डॉ. कल्पना गोरले-थोरात यांना या वर्षासाठीची संशोधन वृत्ती प्रदान करण्यात आलेली आहे, असे यावेळी घोषित करण्यात आले.

# देगलूर तहसील कार्यालयाच्या नवीन इमारतीच्या जागेवर शिक्कामोर्तब

## खा. डॉ. अजित गोपछडे यांच्या प्रयत्नांना यश

**नांदेड (प्रतिनिधी)–** देगलूर तहसील कार्यालयाच्या नूतन इमारतीसाठी उभारण्यात येणाऱ्या जागेचा वाद आता संपुष्टात आला असून येथील तालुका कृषी कार्यालय तथा बीज गुणन केंद्राच्या जागेवरच नूतन इमारत उभारण्यावर शिक्कामोर्तब झाला आहे.

देगलूर तहसील कार्यालयाची डिजिटल वास्तू उभारण्यासाठी राज्यसभा खा. डॉ. अजित गोपछडे यांनी महाराष्ट्र सरकारकडे वारंवार पाठपुरावा केला होता आणि त्यांच्याच अध्यक्षतेखाली नांदेड येथील जिल्हाधिकारी कार्यालयात राहुल कर्डिले यांच्या



प्रमुख उपस्थितीमध्ये जिल्हा प्रशासन बैठकीत सहमतीने उपरोक्त निर्णय घेण्यात आला.

देगलूर तालुक्याच्या विकासाचा आगामी काळातील विचार करता विस्तीर्ण आणि मोठ्या जागेची आवश्यकता आहे. त्या अनुषंगाने देगलूर येथील कृषिअधिकारी कार्यालयची पाच एकर जागा महसूल विभागाकडे हस्तांतरण करुन त्या ठिकणी भव्य आणि प्रशस्त तहसील कार्यालय, अधिकारी, कर्मचारी निवास, पार्किंग, कॅन्टीन यासह सर्व आवश्यक सुविधा या तहसील कार्यालयात निर्माण करावे, असा निर्णय घेण्यात आला.

याप्रसंगी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली, निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर, कार्यकारी अभियंता संदीप कोटलवार, उपजिल्हाधिकारी अनुप पाटील, उपविभागीय अभियंता निळकंठवार यांच्यासह देगलूर तालुक्यातील लोकप्रतिनिधींची उपस्थिती होती.

# नांदेड परिमंडळात प्रधानमंत्री सूर्यग्रह मोफत योजनेस प्रतिसाद; ८०८६ घरांवर ३३ मेगावॅट निर्मिती

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड, परभणी आणि हिंगोली जिल्ह्यांचा समावेश असणाऱ्या महावितरणच्या नांदेड परिमंडळात प्रधानमंत्री सुर्यघर मोफत वीज योजना प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. योजनेतंर्गत ८०८६ घरावर ३२.८३ मेगावॅट सौर ऊर्जेची निर्मिती केली जाते. अन्य वीज ग्राहकांनी ७८ हजार रुपयापर्यंतचे अनुदान असणाऱ्या योजनेत सहभागी होऊन वीजबिलाच्या कटकटीतून मुक्तता मिळविण्याचे आवाहन मुख्य अभियंता राजाराम माने यांनी केले आहे.

योजनेची अधिक प्रभावीपणे अंमलबजावणी होण्यासाठी केंद्र सरकारतर्फे १५ ऑगस्ट रोजी राज्यात सर्वत्र सौर ग्राम दिन साजरा करण्याचे जाहीर करण्यात आले आहे. त्यानिमित्ताने प्रत्येक ग्रामपंचायतमध्ये ग्राम सभाही घेण्यात येणार आहेत. नांदेड परिमंडलातील तीनही जिल्ह्यांत गाव पातळीवर सौर ग्राम दिनाचे आयोजन केले जाणार आहे. त्याप्रसंगाने योजनेचे महत्त्व पटवून देण्यासाठी रॅलीज, सूर्यरथ-चित्ररथाशिवाय योजनेच्या परिपूर्ण माहितीचे पॉम्प्लेट्सही वितरित केले जातील. त्यासाठी महावितरणच्या वरिष्ठ कार्यालयांनी मंडल, विभाग, उपविभाग व शाखा कार्यालयांना निर्देशित केलेले आहे.

नांदेड परिमंडलाने जून २०२५ अखेरपर्यंत या योजनेची प्रभावी अंमलबजावणी केली असून नांदेड जिल्ह्यात ३८५७ घरांच्या छतावर सौरऊर्जा निर्मिती पॅनेल्स् बसविले आहेत. त्यातून १७.०७ मेगावॅट सौर ऊर्जा निर्मिती होते. परभणी जिल्ह्यात ३०२२ घरावरून ११.२३ मेगावॅट तर हिंगोली जिल्ह्यात १२७७ घरावर बसविलेल्या पॅनल्समधून ४.५३ मेगावॅट सौर ऊर्जा निर्मिती होते.

योजनेच्या प्रभावी अंमलबजावण्यासाठी पाच हजार पेक्षा अधिक लोकसंख्या असणारी गावे मॉडेल सोलार व्हिलेज म्हणून निवडण्यात आलेली आहेत. त्यातंर्गत सर्वाधिक सौरयंत्रणा आस्थापित असलेली गावे निवडून केंद्र शासनाकडून एक कोटी रुपयाचे अनुदान पात्र गावांना दिले जाणार आहे. परभणी जिल्ह्यात झरी, टाकळी कुंभकर्ण, राणीसावरगाव, ताडकळस शेळगाव मराठा, भोगाव देवी ही सहा गावे मॉडेल सोलार व्हिलेजसाठी निवडण्यात आली आहेत. सेलू हे शहर या आधीच सोलर सिटी म्हणून पालकमंत्री यांनी जाहीर केले आहे.

घराच्या छतावरील सौरऊर्जा पॅनलद्वारे झालेली वीजनिर्मिती घरगुती वापरापेक्षा अधिकची असल्यास वीजबिल शुन्यावर येईल. सौरऊर्जेची निर्मिती अधिकची असेल, तर ती महावितरणला विकून उत्पन्न मिळविण्याचीही संधी या योजनेत आहे. छतावरील एक किलोवॅटच्या सौर वीज निर्मिती प्रकल्पातून महिना १२०, २ किलोवॅटच्या प्रकल्पातून महिन्याला २४० युनिट तर ३ किलोवॅटच्या प्रकल्पातून सर्वसाधारणपणे ३६० युनिट विजेची निर्मिती होऊ शकते.

ही सौर ऊर्जा योजना अनुदानावर आधारित आहे. एक किलोवॅटपर्यंत ३० हजार, दोन किलोवॅट - ६० जा तर तीन किलोवॅट व त्यापुढील किलोवॅटसाठी ७८ हजार रुपयांचे अनुदान दिले जाते. विविध बँकांकडून सवलतीच्या व्याजदरात कर्ज सुविधाही योजनेसाठी उपलब्ध आहे.

# निराळी समाज सेवा प्रतिष्ठानच्यावतीने गुणवंत विद्यार्थी सन्मान सोहळा

**नांदेड (प्रतिनिधी)–** निराळी समाज सेवा प्रतिष्ठानच्यावतीने निराळी समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा दि. २० जुलै रोजी सन्मान सोहळा होणार आहे.

माहे फेब्रुवारी / मार्च २०२५ मध्ये इयत्ता १० वी, १२ वी इयत्तेत ७५% किंवा त्याहून अधिक गुण मिळवून उत्तीर्ण झालेले २०२५-२६ या वर्षांत मेडिकल व इंजिनीरिंग या व्यवसायीक अभ्यासक्रम प्रवेशास पात्र ठरलेले सर्व विद्यार्थी, नव्याने शासकीय सेवेसाठी विविध पदावर निवड झालेले उमेदवार, शासकीय सेवेतून पदोन्नत्ती व नुकतेच सेवानिवृत्त झालेले सर्व निराळी समाजबांधव यांचा यथोचित सत्कार सोहळा रविवार, दि. २० जुलै २०२५ रोजी सकाळी ११ वाजता वर्कशॉप कॉर्नर, पाण्याच्या टाकीजवळ, अशोक नगर, नांदेड येथील हनुमान मंदिरात आयोजित करण्यात आला आहे. या सत्कार समारंभासाठी नांदेड जिल्ह्यासह वसमत, परळी (वैजनाथ) , डिघोळ (देवीचे) व नागापूर या भागातील विहीत पात्रता धारण करणारे सर्व उमेदवार सत्कारास पात्र असतील. या समारंभाचे अध्यक्षस्थान सामाजिक कार्यकर्ते विनायक कळसकर तर प्रमुख अतिथी म्हणून निवृत्त उपजिल्हाधिकारी गोविंद रणवीरकर, भाजप कार्यकारिणी सदस्य चंद्रकांत गरुडकर, उद्योजक ग्यानोबाराव फुके, टॅक्स कन्सल्टंट सतिश फुके नांदेड हे भूषवणार आहेत. समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांच्या पालकांनी आपल्या पाल्यांच्या गुणपत्रिकेची सॉप्ट प्रत किंवा हार्ड प्रत नारायण पारेकर (मो.८३०८० ५१९५१) आणि चंद्रकांत दामेकर (मो. ७७५८० ९१३७२) या मोर्बाल क्रमांकावर पाठवावे, असे आवाहन सामाजिक कार्यकर्ते मोहन कुरुडे, पांडूरंग गज्जेवार, प्रभाकर पारेकर यांनी केले आहे.

# २७ जुलै रोजी नांदेड सिडको ते शिर्डी पदयात्रेचे आयोजन

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड सिडको, साईबाबानगर बिडी कॉलनी येथील साईबाबा मंदिर ते शिर्डीपर्यंत दि. २७ जुलै रोजी पदयात्रेचे आयोजन करण्यात आले आहे.

मागील १४ वर्षांपासून नांदेड ते शिर्डी पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात येते. यावर्षी दि. २७ जुलै रोजी सकाळी ९ वाजता साईबाबानगर बिडी कामगार कॉलनी सिडको येथून ही पदयात्रा निघणार आहे. या पदयात्रेत जवळपास १०० भाविक-भक्त सहभागी होणार असून ही यात्रा ४१७ किलोमीटर असणार आहे. यात पहिल्या दिवशी सिडको ते मरळक, आरळ, परभणी, पाळोदी, पाथरी, आष्टी, पिपरखेडा, घुंगरडे हदगाव, ऊचेगाव, पैठण, भायेगाव, नेवासा मार्गे शिर्डी येथे दि. १० ऑगस्ट ही पदयात्रा पोहचणार आहे. या पदयात्रेत सहभागी होणाऱ्या भाविकांस साई पालखी सेवाभावी संस्था यांच्या सौजन्याने एक वेळा नाष्टा व दोन वेळेस जेवण देण्यात येणार आहे.

नांदेड सिडको ते शिर्डी पदयात्रा सोहळ्याला परिसरातील नागरिक, भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन अध्यक्ष गणेश जयस्वाल, उपाध्यक्ष नागोराव वाघमोडे व साईबाबा पालखी सोहळा यांच्यावतीने करण्यात आले आहे.

# कथाकार भारत दाढेल यांच्या 'किस्ना' कथासंग्रहाला मातोश्री कै.सौ. केवळबाई मिरेवाड राज्यस्तरीय पुरस्कार घोषित

**नांदेड (प्रतिनिधी)–** येथील लोकमतचे उपसंपादक तसेच कथाकार भारत दाढेल यांच्या 'किस्ना' या कथासंग्रहाला मातोश्री कै. सौ. केवळबाई मिरेवाड राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर झाला आहे. नायगाव (जि. नांदेड) येथील मातोश्री कै. सौ. केवळबाई मिरेवाड यांच्या स्मृतिप्रित्यर्थ दरवर्षी दिला जाणारा हा पुरस्कार यंदाच्या वर्षी सहाव्या वर्षात पदार्पण करत आहे.

साहित्यिक भारत दाढेल यांचा 'किस्ना' हा कथासंग्रह इसाप प्रकाशन, नांदेड यांच्यामार्फत प्रकाशित झाला असून, यंदाच्या पुरस्कारासाठी या ग्रंथाची निवड करण्यात आली. ज्येष्ठ साहित्यिक डॉ. अशोक कौतिक कोळी तसेच अक्षर गणगोतचे संपादक पांडुरंग पुठ्ठेवाड यांच्या मार्गदर्शनाखालील परीक्षण समितीने हा निर्णय घेतला आहे. या पुरस्काराचे स्वरूप रोख रक्कम, सन्मानचिन्ह व प्रशस्तिपत्र असे आहे.



पुरस्कार संयोजक वीरभद्र मिरेवाड यांनी या पुरस्काराची घोषणा मातोश्री कै. सौ. केवळबाई मिरेवाड यांच्या पुण्यस्मरणदिनी नायगाव येथे केली. लवकरच नायगाव येथे नांदेडचे खासदार रवींद्र वसंतराव चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली पुरस्कार वितरण सोहळा पार पडणार आहे.

'किस्ना' या कथासंग्रहाला याआधीही अनेक नामांकित पुरस्कारांनी गौरवण्यात आले आहे. मराठी वायय परिषद बडोदा आयोजित अखिल भारतीय कथासंग्रह स्पर्धेत प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले असून, उज्वल प्रतिष्ठान कंधारतर्फे देण्यात येणारा उज्वल साहित्यरत्न पुरस्कार आणि डॉ. अण्णाभाऊ साठे साहित्य परिषद महाराष्ट्र राज्य आयोजित सहाव्या राज्यस्तरीय साहित्य संमेलनात मुक्ता साळवे राज्यस्तरीय लक्षवेधी साहित्य पुरस्कारदेखील या संग्रहाला प्राप्त झाला आहे.

भारत दाढेल हे गेली दोन दशके पत्रकारिता क्षेत्रात कार्यरत असून, त्यांनी विविध राज्यस्तरीय पुरस्कार पटकावले आहेत. लेखनासोबतच ते एक कुशल चित्रकारही असून, अनेक ग्रंथांची मुखपृष्ठे व अंतर्गत रेखाचित्रे त्यांनी साकारली आहेत.

# कलावतीबाई ताटे यांचे निधन



**नरसी (प्रतिनिधी)–** येथील वयोवृद्ध महिला कलावतीबाई रावसाहेब पाटील ताटे (७९) यांचे दि.१७ जुलै रोजी अल्पशा आजाराने निधन झाले.

त्यांच्या पार्थिवावर आज दि.१८ जुलै रोजी सकाळी ११ वाजता नरसी जुनेगाव ता. नायगाव येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात पती, एक मुलगी, सुन नातवंड असा परिवार आहे.

## बिलोली नगर परिषद ,बिलोली जि. नांदेड

### दरपत्रक सुचना

बिलोली नगरपरिषदेस आवश्यक असलेले खालीलप्रमाणे कामे करीता स्वतंत्र दरपत्रक मुख्याधिकारी, नगरपरिषद बिलोली हे मागवित आहेत. लिफाफा बंद दरपत्रके नगरपरिषद बिलोली या कार्यालयात स्विकारण्यात येतील. प्रत्येक बाबींचा, अमानत, रक्कम नियम व अटी (कॉ) दरपत्रक दरपत्रक बाबतचा तपशिल नगरपरिषद कार्यालयीन सुट्टीचे दिवस वगळून पाहावयास मिळतील.

| अ.क्र. | कामाचे नाव | इसारा रक्कम (रुपये) | दरपत्रक फॉर्म फी ( रुपये ) |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| 1 | बिलोली नगरपरिषद सार्वजनिक वाचनालय करिता ग्रंथ /पुस्तके खरेदी करणेबाबत. | 1,000/- | 1,00/- |

| अ. क्र. | वेळापत्रक | पासुन | | पर्यंत | |
|---|---|---|---|---|---|
| | | दिनांक | वेळ | दिनांक | वेळ |
| 1 | दरपत्रक प्रसिध्दी ,दरपत्रक फॉर्म ,परिशिष्ट, इसारा रक्कम व दरपत्रक फॉर्म फी भरणे, दरपत्रक भरणे व इतर कागदपत्र कार्यालयातुन मिळविण्याचा कालावधी, | 18/07/2025 | सकाळी 10:00 वा | 25/07/2024 | दु. 5:00 वा |

निविदेच्या अटी व शर्ती खालील प्रमाणे आहेत .

| | |
|---|---|
| १ | दरपत्रक बाबत आवश्यक बाबी. अ) प्रत्येक कामाच्या दरपत्रक पपत्राची रक्कम व इसारा रक्कम दोन्ही रक्कमेचे स्वतंत्र भरणा करावे ब) अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे प्रमाणपत्र ( परिशिष्ट -१) व काळ्या यादित नाव नसल्याबाबतचे प्रमाणपत्र ( परिशिष्ट -२) हे दोन्ही प्रमाणपत्र स्वाक्षरीसह अपलोड करणे बंधनकारक आहे. क) लिफाफा क्र. १ मध्ये इसारा अनामत रक्कम व दरपत्रक फॉर्म फी भरल्याची पावती , पॅनकार्ड ,शॉपॲक्ट, GST रजिस्ट्रेशन ड) निविदेसोबत देण्यात आलेल्या दरपत्रक फॉर्म मध्येच दर भरावेत , सदरील दर हे मुल्यवर्धित कर , आयकर , वाहतुक खर्च व इतर कर इत्यादीसह समाविष्ट असावेत. |
| २ | उपरोक्त कागदपत्रे सादर करण्यात कोणतीही वाढिव मुदत अथवा सवलत दिली जाणार नाही . |
| ३ | सादर केलेल्या सर्व दरपत्रक ची लिफाफा क्र. १ ची तांत्रीक छाननी नगर परिषद कार्यालय बिलोली येथे केली जाईल तपासनीअंती पात्र दरपत्रक धारकांची दरपत्रक प्रक्रियेसाठी विचार करण्यात येईल व पात्र कंत्राटदार यांचाच लिफाफा क्र. २ उघडण्यात येईल. |
| ५ | सदर कामास दरवाढ लागु असणार नाही. बालकामगार कामावर ठेवता येणार नाही. |
| ६ | स्थायी निर्देश क्र. ३६ च्या सर्व अटी बंधनकारक राहतील |
| ७ | दरपत्रक पपत्रातील सविस्तर दरपत्रक नोटीस मधील सर्व अटी व शर्ती कंत्राटदारांना बंधनकारक असतील |
| ८ | सदरील कामाचे देयक नगरपरिषद कार्यालयाच्या निधी उपलब्धतेनुसार देण्यात येईल. |
| 9 | दरपत्रकातील अटी व शर्ती बदल करण्याचा व तसेच कोणतेही कारन न देता दरपत्रक स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार न.प. राखुन ठेवला आहे. |

मुख्याधिकारी
नगर परिषद ,बिलोली

## बिलोली नगर परिषद ,बिलोली जि. नांदेड

### दरपत्रक सुचना

बिलोली नगरपरिषदेस आवश्यक असलेले खालीलप्रमाणे कामे करीता स्वतंत्र दरपत्रक मुख्याधिकारी, नगरपरिषद बिलोली हे मागवित आहेत. लिफाफा बंद दरपत्रके नगरपरिषद बिलोली या कार्यालयात स्विकारण्यात येतील. प्रत्येक बाबींचा, अमानत, रक्कम नियम व अटी (कॉ) दरपत्रक दरपत्रक बाबतचा तपशिल नगरपरिषद कार्यालयीन सुट्टीचे दिवस वगळून पाहावयास मिळतील.

| अ.क्र. | कामाचे नाव | इसारा रक्कम (रुपये) | दरपत्रक फॉर्म फी ( रुपये ) |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| 1 | बिलोली नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक 2025 करिता छपाई तसेच स्टेशनरी साहित्य पुरवठा करणेबाबत. | 1,000/- | 1,00/- |

| अ. क्र. | वेळापत्रक | पासुन | | पर्यंत | |
|---|---|---|---|---|---|
| | | दिनांक | वेळ | दिनांक | वेळ |
| 1 | दरपत्रक प्रसिध्दी ,दरपत्रक फॉर्म ,परिशिष्ट, इसारा रक्कम व दरपत्रक फॉर्म फी भरणे, दरपत्रक भरणे व इतर कागदपत्र कार्यालयातुन मिळविण्याचा कालावधी, | 18/07/2025 | सकाळी 10:00 वा | 25/07/2025 | दु. 5:00 वा |

निविदेच्या अटी व शर्ती खालील प्रमाणे आहेत .

| | |
|---|---|
| १ | दरपत्रक बाबत आवश्यक बाबी. अ) प्रत्येक कामाच्या दरपत्रक पपत्राची रक्कम व इसारा रक्कम दोन्ही रक्कमेचे स्वतंत्र भरणा करावे ब) अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे प्रमाणपत्र ( परिशिष्ट -१) व काळ्या यादित नाव नसल्याबाबतचे प्रमाणपत्र ( परिशिष्ट -२) हे दोन्ही प्रमाणपत्र स्वाक्षरीसह अपलोड करणे बंधनकारक आहे. क) लिफाफा क्र. १ मध्ये इसारा अनामत रक्कम व दरपत्रक फॉर्म फी भरल्याची पावती , पॅनकार्ड ,शॉपॲक्ट, GST रजिस्ट्रेशन ड) निविदेसोबत देण्यात आलेल्या दरपत्रक फॉर्म मध्येच दर भरावेत , सदरील दर हे मुल्यवर्धित कर , आयकर , वाहतुक खर्च व इतर कर इत्यादीसह समाविष्ट असावेत. |
| २ | उपरोक्त कागदपत्रे सादर करण्यात कोणतीही वाढिव मुदत अथवा सवलत दिली जाणार नाही . |
| ३ | सादर केलेल्या सर्व दरपत्रक ची लिफाफा क्र. १ ची तांत्रीक छाननी नगर परिषद कार्यालय बिलोली येथे केली जाईल तपासनीअंती पात्र दरपत्रक धारकांची दरपत्रक प्रक्रियेसाठी विचार करण्यात येईल व पात्र कंत्राटदार यांचाच लिफाफा क्र. २ उघडण्यात येईल. |
| ५ | सदर कामास दरवाढ लागु असणार नाही. बालकामगार कामावर ठेवता येणार नाही. |
| ६ | स्थायी निर्देश क्र. ३६ च्या सर्व अटी बंधनकारक राहतील |
| ७ | दरपत्रक पपत्रातील सविस्तर दरपत्रक नोटीस मधील सर्व अटी व शर्ती कंत्राटदारांना बंधनकारक असतील |
| ८ | सदरील कामाचे देयक नगरपरिषद कार्यालयाच्या निधी उपलब्धतेनुसार देण्यात येईल. |
| 9 | दरपत्रकातील अटी व शर्ती बदल करण्याचा व तसेच कोणतेही कारन न देता दरपत्रक स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार न.प. राखुन ठेवला आहे. |

मुख्याधिकारी
नगर परिषद ,बिलोली

# युवा

## फसवणूक करणेच नव्हे तर इमोशनल कनेक्शन हीच खरी लॉयल्टी!

**नातेसंबंध विश्वासावर बांधले जातात आणि विश्वास निष्ठेवर बांधला जातो. जेव्हा आपण एखाद्याशी जोडले जातो तेव्हा हृदयाच्या कोणत्यातरी कोपऱ्यात नक्कीच आशा असते की ते आपल्याशी खरे राहतील. पण निष्ठा असणे हे फक्त शारीरिक निष्ठेपुरते मर्यादित आहे की त्याची व्याप्ती खूप मोठी आहे?**



मानसोपचार तज्ज्ञ डॉ. आस्तिक जोशी यांच्या मते, आजच्या धावपळीच्या जीवनात नातेसंबंध टिकवणे वाटते तितके सोपे नाही. कधीकधी लहान गोष्टी मोठ्या भेगा निर्माण करतात. अशा परिस्थितीत, निष्ठा हा प्रत्येक वादळात नातेसंबंधाला एकजूट ठेवणारा धागा बनू शकतो. निष्ठा म्हणजे केवळ फसवणूक न करणे नाही, तर परिस्थिती काहीही असो, त्या व्यक्तीच्या पाठीशी नेहमीच उभे राहणे. त्यात भावनिक, मानसिक आणि नैतिक वचनबद्धता देखील समाविष्ट आहे. जर तुम्ही या गोष्टी पूर्ण केल्या तर माझ्यावर विश्वास ठेवा, तुमचे नाते प्रत्येक परीक्षेत उत्तीर्ण होईल.

- मनापासून जपलेले नाते : बऱ्याचदा लोक निष्ठा शारीरिक फसवणूक न करण्यापुरती मर्यादित ठेवतात, परंतु निष्ठा त्यापेक्षा खूप खोल असते याचा अर्थ असा की सर्वांसमोर आपल्या जोडीदारासाठी उभे राहणे म्हणजेच प्रामाणिकपणा, त्यांच्या भावना समजून घेणे, त्यांचा आदर करणे आणि त्यांच्या गरजा जाणणे. जेव्हा तुम्ही एखाद्यासाठी वेळ काढता, त्यांचे ऐकता आणि त्यांना समजून घेता, तेव्हा ती निष्ठा नात्याला खऱ्या अर्थाने चालना देते. ते एक असे बंधन निर्माण करते जे केवळ तोंडी नसून आत्म्याचे असते.
- भावनिक संबंध : चांगले नाते केवळ शारीरिक सहवासाबद्दल नसते, तर भावनिक जोडणीबद्दल देखील असते. जेव्हा तुम्ही तुमच्या जोडीदाराचे हृदय ऐकता, त्यांच्या समस्या अनुभवता आणि न बोलता त्या समजून घेता - तेच निष्ठेचे खरे रूप आहे. जेव्हा एखाद्याला वाटते की तो तुमच्यासोबत सुरक्षित आहे, तेव्हापासून एक खोल, निष्ठावान बंधन सुरू होते. हे कनेक्शन नात्याला काळाच्या कसोटीवर टिकण्यास मदत करते.
- लपलेल्या गोष्टी : प्रत्येक नाते पारदर्शकतेची मागणी करते. जेव्हा तुम्ही जाणूनबुजून काही लपवता तेव्हा तुम्ही त्या व्यक्तीचा विश्वासच तोडत नाही तर नाते अदृश्य ओझे देखील वाहू लागते. प्रकरण कितीही लहान असले तरी, जोपर्यंत दोन्ही जोडीदार प्रामाणिकपणे आणि उघडपणे बोलत नाहीत तोपर्यंत निष्ठा अपूर्ण राहील. निष्ठावान नात्याचा पाया काहीही लपवू नका हा असतो - ही सवय नात्याला खोली देते आणि ते तुटण्यापासून रोखते.
- विश्वासू असणे : एक निष्ठावान जोडीदार असा असतो ज्यावर तुम्ही आंधळेपणाने विश्वास ठेवू शकता. त्याची उपस्थिती केवळ शारीरिक उपस्थिती नसते तर मानसिक आधारदेखील असतो. तो तुमच्या प्रत्येक भीतीमागे भिंतीसारखा उभा राहतो आणि तुमच्या प्रत्येक स्वप्नात पहिला चीअरलीडर बनतो. त्याचे शब्द, त्याची उपस्थिती आणि त्याचा आधार - हे सर्व मिळून एक असे नाते निर्माण करते जे केवळ निष्ठावानच नाही तर आयुष्यभरासाठी देखील असते.
- आराम अन् भावनिक सुरक्षितता : जेव्हा दोन्ही जोडीदार पूर्णपणे निष्ठावान असतात, तेव्हा नात्यात एक शांती येते. यात काही शंका नाही, भीती नाही - फक्त एक विश्वास असतो की तो माझ्यासोबत आहे, काहीही असो... ही भावनिक सुरक्षितता मानसिक तसेच नात्याच्या पातळीवर आणखी मजबूत बनवते. जेव्हा एखाद्या नात्याला निष्ठेने जोपासले जाते, तेव्हा ते फक्त एकत्र असण्याचीच नव्हे तर एकमेकांसोबत असण्याची भावना बनते.




## कुणी देतंय पतीला मारण्याची सुपारी तर कुणी हातोड्याने घेत आहे प्राण!

# मध्यवर्गीयांत दहशत, लग्नापूर्वी गुप्तहेरी!

**प्रियकराच्या संगनमताने पतीची हत्या करून मृतदेह नदीत फेकला... पतीची हत्या करून सिमेंटने भरलेल्या ड्रममध्ये ठेवले... अवैध संबंधांच्या संशयावरून पत्नीची हत्या... अशा बातम्यांमुळे त्यांच्या मुलांसाठी जोडीदार शोधणाऱ्या पालकांच्या चिंता वाढल्या आहेत. हेच कारण आहे की आता मध्यमवर्गीय देखील त्यांच्या भावी जावई किंवा सुनेची हेरगिरी करत आहेत.**

लग्नापूर्वी भावी जावई किंवा सुनेची हेरगिरी करणे हा आतापर्यंत उच्चभ्रू वर्गाचा छंद मानला जात होता, तर मध्यमवर्गीय लोक हा निरुपयोगी खर्च समजून त्यापासून दूर राहत असत. सामान्य वर्गातील लोक एखाद्याची हेरगिरी करणे हा अपमान मानतात. म्हणूनच, मध्यमवर्गीय लोक लग्नापूर्वी मुलाच्या किंवा मुलीच्या परिसरात माहिती गोळा करून आपले मन समाधानी करायचे. पण अलीकडेच सोनमने तिच्या प्रियकराच्या मदतीने पती राजा रघुवंशीची हत्या केली, त्यामुळे प्रत्येक व्यक्तीच्या मनाला थरकाप उडाला आहे. यापूर्वी, नोएडामध्ये अवैध संबंधांच्या संशयावरून पतीने आपल्या अभियंता पत्नीची हत्या केल्याचे प्रकरणही मथळ्यांमध्ये होते. या घटनांमुळे केवळ लग्न करणारे तरुणच नाही तर त्यांचे पालकही तणावाखाली आहेत. त्यामुळे, आजकाल मध्यमवर्गीय कुटुंबे देखील त्यांच्या मुलांचे लग्न निश्चित करण्यापूर्वी गुप्तहेर संस्थांची मदत घेत आहेत.



- जर कुटुंबाने गुप्तहेर संस्थेकडून चौकशी केली तर किती खर्च येतो? तज्ज्ञांच्या मते, जर तुम्ही सामान्य चौकशी केली तर त्यांच्या घराजवळ मुलगा आणि मुलगी यांची माहिती गोळा केली जाते. त्यांची नोकरी, व्यवसाय आणि करिअर शोधले जाते. तसेच त्यांचे डिजिटल जीवन शोधले जाते. यावरून त्यांचे वर्तन आणि चारित्र्य कसे आहे हे दिसून येते.

### गुन्हेगारी मानसिकतेचे?

बदलत्या काळात विवाहस्थळे आणि सोशल मीडियाद्वारे मुलगा किंवा मुलगी शोधण्याचा ट्रेंड अरेंज्ड मॅरेजमध्ये वाढला आहे. परंतु अशा प्रकरणांमध्ये, कुटुंब गुप्तहेर संस्थांची मदत घेते. आता मध्यमवर्गीय कुटुंबेदेखील मुलगा आणि मुलगी आणि त्यांच्या कुटुंबाचे गुन्हेगारी खटले आणि गुन्हेगारी पार्श्वभूमी तपासत आहेत. असे नाही की पालकांना एखाद्यावर संशय असल्याने अशा तपासाची आवश्यकता असते, परंतु आजकाल ज्या प्रकारची प्रकरणे समोर येत आहेत त्यामुळे ते अशा तपासाची आवश्यकता मानत आहेत. राहुल राय गुप्ता म्हणतात, की आता मध्यमवर्गीय कुटुंब हे शोधू इच्छिते की मुलगा किंवा मुलगी गुन्हेगारी मानसिकतेत आहे की नाही. पालकांनाही काळजी वाटते की मुलगा किंवा मुलगी दुसऱ्या कुणाच्या नातेसंबंधात नसावी. एवढेच नाही तर पालक मुलाचे किंवा मुलीचे लैंगिक आकर्षण काय आहे याची चौकशी देखील करत आहेत? म्हणजेच त्यांना कोणत्या लिंगाबद्दल आकर्षण वाटते.

- व्हेनस डिटेक्टिव्ह एजन्सीच्या संस्थापक आकृती खत्री म्हणतात, की विवाहित जोडप्यांमध्ये ज्या प्रकारच्या गुन्हेगारी घटना पाहायला मिळत आहेत त्यामुळे मध्यमवर्गीय कुटुंबेही त्यांच्या मुलांच्या लग्नाबद्दल खूप चिंतित झाली आहेत. पूर्वी मध्यमवर्गीय कुटुंबात गुप्तहेर संस्था ही निषिद्ध मानली जात होती, पण आता ती वापरणे भाग पडत आहे. सुरक्षिततेसाठी प्राधान्य दिले जात आहे. आता आमच्याकडे मध्यमवर्गीय कुटुंबांकडून अनेक प्रकरणे येत आहेत. पूर्वी ही मागणी केवळ उच्चभ्रू वर्गापुरती मर्यादित होती.
- गुप्तहेर संस्थेच्या मालकाने नाव न सांगण्याच्या अटीवर सांगितले की, पूर्वी लग्नानंतर फक्त मुलगा आणि मुलगी यांच्यातील दुरावा, मुलगी घराबाहेर पडणे किंवा पत्नीला मारहाण करणे अशी प्रकरणे पाहिली जात होती. अशा परिस्थितीत पालकांना असे वाटायचे की जर त्यांना चांगले कुटुंब मिळाले तर ते लग्नासाठी पुरेसे आहे. पण आता लग्नानंतर ज्या प्रकारचे गुन्हे उघडकीस येत आहेत, त्यामुळे लोक दुसऱ्या कुटुंबाबद्दल खूप सावधगिरी बाळगू लागले आहेत. गुप्तहेर गुरुचे संस्थापक राहुल राय गुप्ता म्हणतात, की पूर्वी लोक लग्नासाठी मुलगा आणि मुलगी तपासण्यासाठी आमची मदत घेत असत, पण आज लोक गुन्हेगारी घटनांच्या भीतीने आमच्याकडे येत आहेत.



### तपासाच्या दिवशीचा खर्च

- एक ते दोन दिवसांसाठी तपास: १५ ते २० हजार रुपये
- अनेक दिवसांसाठी सखोल तपास: ३५ ते ४० हजार रुपये

यामध्ये, एक ते दोन दिवसांसाठी तपास केला जातो, ज्याची फी १५ ते २० हजार असते. दुसरीकडे, जर सखोल चौकशी केली तर मुलाची किंवा मुलीची अनेक दिवसांसाठी चौकशी केली जाते. त्यांचा अनेक वेळा पाठलाग केला जातो, ज्यामध्ये मुलगा किंवा मुलगी कुठे जाते, ते काय करतात, कोणाला भेटतात, कुठे काम करतात याबद्दल माहिती गोळा केली जाते. याशिवाय, मुलगा किंवा मुलगी वीकेंडच्या रात्री कुठे जाते आणि कोणाला भेटतात, या सर्व गोष्टींची चौकशी केली जाते. या तपासासाठी ३५ ते ४० हजार खर्च येतो.

### पालकांना हवी या गोष्टींची चौकशी

- मुलगा किंवा मुलगी किंवा त्यांच्या कुटुंबातील कोणाचाही गुन्हेगारी इतिहास आहे का?
- मुलगा किंवा मुलीची कोणत्याही प्रकारची गुन्हेगारी मानसिकता आहे का?
- मुलगा आणि मुलीचे मित्र कोण आहेत आणि त्यांना कोणत्या प्रकारचा कंटेंट पहायला आवडतो?
- मुलगा किंवा मुलगी कोणाशी प्रेमसंबंध आहे का?
- जर त्यांचे आधी कोणाशी प्रेमसंबंध होते, तर ते अजूनही संपर्कात आहेत का?
- तो/ती आधीच विवाहित आहे किंवा घटस्फोटित आहे का?

# अवाजवी अपेक्षा वैवाहिक जीवनात आणताहेत दरी

**रोमँटिक जेवण, परदेश दौरे, खरेदी, प्रेमाचे बरेच क्षण. या स्वप्नाळू अपेक्षा आहेत ज्यांशी संपूर्ण विवाहित जीवन अनेकदा जोडले जाते. पण हे प्रत्यक्षात घडते का, नाही. लग्नात तणाव, भांडणे आणि विचारांमध्ये मतभेदांचे क्षणही असतात, ज्यांचा सामना करताना विवाहित जीवन कठीण वाटू शकते. पण यामुळे लग्न तुटू शकते का? आजच्या सोशल मीडिया शो ऑफच्या युगात मनात हा प्रश्न निर्माण होऊ शकतो. तुम्हीही लग्न आणि अपेक्षांच्या धाग्यातील संबंध समजून घेतला पाहिजे...**



जीवनाचा वेग : आजकाल जीवनाचा वेग वाढत असेल पण लग्नाचा कालावधी कमी होत असल्याचे दिसून येते. घटस्फोटाच्या वाढत्या घटना याची साक्ष देतात. डॉक्टरांच्या मते, संवादाचा अभाव आणि वाढत्या अपेक्षा हे नात्यात समस्या निर्माण करण्याचे प्रमुख कारण असू शकतात. आपण स्वतःला एक प्रश्न विचारला पाहिजे की काल्पनिकतेच्या मदतीने नाते चालवण्याचा प्रयत्न केला जात आहे का. त्यात वास्तविकतेला स्थान दिले आहे की नाही?

बालपणीची प्रतिमा : लहानपणापासूनच, आपल्याला टीव्ही, चित्रपट आणि आता सोशल मीडियाद्वारे नातेसंबंधाचे स्वरूप समजते. ज्यामध्ये जगाचे प्रेम, मौजमजा आणि समाधान दिसते. आपण त्याच प्रकारे नातेसंबंधाचे जाळेही विणायला सुरुवात करतो. चित्रपट आणि इतर माध्यमांद्वारे आपण हे देखील ठरवतो की एक दिवस आपल्याला आपल्या स्वप्नांचा राजकुमार किंवा राजकुमारी मिळेल आणि लग्नानंतर आयुष्य आनंदाने भरलेले असेल. वास्तविक जीवनात प्रेमाकडे विश्वास, नियमित प्रयत्न आणि विकासाच्या दृष्टिकोनातून पाहिले पाहिजे.

जोडप्यांमध्ये निराशा : तज्ज्ञांचा असा विश्वास आहे की गेल्या काही वर्षांत त्यांनी अनेक जोडप्यांना निराश पाहिले आहे. याचे कारण अपेक्षा आणि वास्तवातील अंतर आहे. जेव्हा एखाद्याला कल्पनाशक्तीचे जीवन मिळत नाही तेव्हा जोडप्यांमध्ये दरी निर्माण होऊ लागते. निराशा हा याचा परिणाम आहे. प्रत्येकाला वाटते की त्यांच्या जोडीदाराने प्रत्येक इमोशन, फायनान्स, सोशल इंटरेक्शन (सामाजिक संवाद) आणि अध्यात्मात चांगले काम करावे. असे करणे नेहमीच शक्य नसते.

भावनिक समाधान : प्रत्येकाला वाटते की त्यांच्या जोडीदाराने भावनिक समाधान द्यावे. यामुळे, नात्यावर खूप दबाव येतो. मग नात्यातही तडा जाऊ लागतो. भावनिक समाधान कोणासोबत नाही तर आतून जाणवते. सोशल मीडियाने ही अपेक्षा वाढवली आहे. कारण ते एका परिपूर्ण नात्याचे वेगळे रूप दाखवते. सोशल मीडियावर आदर्श नाते म्हणून भव्य सुट्ट्या, प्रणय आणि अनेक प्रकारचे स्वप्नाळू क्षण सादर केले जातात. तर ज्या जोडप्यांचे फोटो आणि व्हिडिओ हे सर्व दाखवतात ते देखील आदर्श नसून त्यांच्या संपादित आवृत्तीसारखे असतात.

दोन लोकांची भागीदारी : दोन लोकांची भागीदारी दोन परिपूर्ण लोकांमुळे यशस्वी होत नाही तर भिन्न असूनही एकमेकांचे निर्णय आणि परिस्थिती स्वीकारल्यानेच ते अपयशी होण्यापासून वाचतात. या काळात विश्वास, मैत्री आणि सामायिक मूल्ये उपयुक्त असतात आणि नात्यात प्रेम टिकून राहते.

उणिवा पूर्ण करा : निरोगी विवाहासाठी आपसी कमतरता दूर केल्या जातात. यासाठी, प्रेमाला नवीन पद्धतीने समजून घ्यावे लागेल. काही गोष्टींकडे लक्ष द्या. जसे की, स्वीकृती ही विचारसरणी प्रत्येक परिस्थितीत उपयुक्त असते. खऱ्या प्रेमात विकास सतत होत असतो. प्रेम केवळ चांगल्या काळातच नाही तर प्रत्येक परिस्थितीत सारखे असते.



### अपेक्षांचे संतुलन

तज्ज्ञांचा असा विश्वास आहे की जोडप्यामध्ये नेहमीच अपेक्षांचे संतुलन असले पाहिजे. प्रत्येकाला त्यांचा स्वाभिमान राखण्याचा अधिकार आहे. लग्न म्हणजे दोन लोक एकत्र चालण्याबद्दल नाही तर वेगवेगळ्या मार्गांवरही आनंदाने एकत्र जीवन जगण्याबद्दल आहे. त्यात आदर, स्वप्ने आणि करुणा देखील समाविष्ट आहे. तज्ज्ञांचे म्हणणे आहे की प्रेम नसल्याने विवाह अयशस्वी होत नाहीत. विवाह तुटण्याचे कारण म्हणजे जीवनात कल्पनारम्यता आणण्याचा प्रयत्न. म्हणून, स्वप्नाळू अपेक्षा मागे सोडून वास्तविक परिस्थिती आणि विचारांशी संबंध जोडणे महत्वाचे आहे.

## प्रेमातही टिकवा आत्ममूल्य

**स्वतःवर प्रेम करा : मी योग्य आहे, माझी किंमत आहे हे स्वतःला रोज पटवून द्या. तुमचं स्वतःचं अस्तित्व केवळ त्या नात्यावर अवलंबून नाही.**

- नाही म्हणायला शिका : प्रेमात सगळं हो म्हणणं हे समर्पण नाही तर आत्मगौरव विसरणं ठरू शकतं. जे मनापासून नको वाटतं, त्याला प्रामाणिकपणे नाही म्हणणं हे आत्ममूल्याचं लक्षण आहे.
- तुमचं मत मांडायला घाबरू नका : नात्यात मतभेद असणं स्वाभाविक आहे. तुमच्या भावना, विचार, गरजा स्पष्ट बोलून दाखवा – त्यावर तुमचा अधिकार आहे.
- स्वतंत्र ओळख जपा : तुमचं एखादं करिअर, छंद, सवयी, मैत्री यांचं महत्त्व कमी करू नका. नात्याशिवायही तुमचं आयुष्य पूर्ण आहे, हे स्वतःलाही आणि जोडीदारालाही जाणवू द्या.
- स्वतःच्या यशाचा आदर करा : आपल्या छोट्या यशांचंही कौतुक स्वतः करा. कुणी इतर कौतुक करेल याची वाट बघू नका. जोडीदाराच्या मतावर अवलंबून राहू नका. त्याने छान वाटतं म्हटल्यावरच जर तुमचा आत्मविश्वास वाढत असेल तर थांबा. तुमचं आत्ममूल्य बाहेरून मिळणाऱ्या मान्यतेवर नाही, तर अंतर्गत समजुतीवर अवलंबून असावं.
- तुमच्या मर्यादा स्पष्ट ठेवा : कुठल्या गोष्टी चालतील आणि कुठल्या नाही, याचं स्पष्ट भान ठेवा. प्रेमात सर्व काही चालतं ही भूमिका चुकीची आहे.
- स्वतःला दोष देणं थांबवा : नात्यात काही चूक झाली तर सारखं माझीच चूक असावी असं वाटू देऊ नका. समस्या दोघांची असते, ती फक्त एकट्याने सोडवायची नसते.



# स्वच्छतेत महाराष्ट्राची आघाडी

## मिरा भाईंदर मनपा देशात प्रथम; राज्याला एकूण दहा राष्ट्रीय पुरस्कार प्रदान



**नवी दिल्ली(प्रतिनिधी)–** स्वच्छ भारत मिशन–शहरी अंतर्गत आयोजित ‘स्वच्छ सर्वेक्षण २०२४–२५’ मध्ये महाराष्ट्राने पुन्हा एकदा देशात आपले वर्चस्व सिद्ध केले असून राज्याला एकूण दहा राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त झाले आहेत. यंदाच्या सर्वेक्षणात मिरा भाईंदर महानगरपालिकेने देशात सर्वप्रथम क्रमांक पटकावत राज्याचा नावलौकिक वाढविला आहे.

नवी दिल्लीतील विज्ञान भवन येथे आयोजित कार्यक्रमात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्याहस्ते या राष्ट्रीय पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. यावेळी केंद्रीय गृहनिर्माण नगर विकास मंत्री मनोहर लाल आणि राज्यमंत्री तोखन साहू यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. राज्याच्या नगर विकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, प्रधान सचिव नगरविकास विभाग–२ डॉ. के.एच. गोविंदराज, राज्य मिशन डायरेक्टर स्वच्छ महाराष्ट्र शहरी नवनाथ वाठ उपस्थित होते.

स्वच्छशहरांच्यामूल्यांकनामध्ये ( ठाणे जिल्हा ) मिरा भाईंदर महानगर पालिकेने ३ ते १० लाख लोकसंख्येच्या गटात देशात अव्वल स्थान मिळवले आहे. हा पुरस्कार माननीय राज्यमंत्री यांच्यासह महानगरपालिकेचे आयुक्त राधा बीनोद शर्मा त्यांच्या सहकार्यासह स्वीकारले. कराड नगरपालिकाने ५० हजार ते ३ लाख लोकसंख्येच्या गटात देशात दुसरे स्थान पटकावले आहे. हा पुरस्कार राज्यमंत्री श्रीमती मिसाळ यांच्यासह मुख्य अधिकारी प्रशांत वटकर यांनी स्वीकारला

१० लाखांहून अधिक लोकसंख्या असलेल्या गटात ( ठाणे जिल्हा ) नवी मुंबई महानगरपालिकेने सुपर स्वच्छ लीग सिटी पुरस्कार पटकावला आहे पुरस्कार राज्यमंत्री श्रीमती मिसाळ यांच्यासह आयुक्त डॉक्टर कैलास शिंदे यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

५०,००० ते ३ लाख लोकसंख्येच्या गटात (पुणे जिल्हा) लोणावळा नगरपालिकाने, २०,००० ते ५०,००० लोकसंख्येच्या गटात ( सांगली जिल्हा) विटा नगरपालिकाने, ( पुणे जिल्हा) सासवड नगरपालिका आणि (अहिल्यानगर जिल्हा) देवळाली प्रवरानगर नगरपालिका, तर २०,००० पेक्षा कमी लोकसंख्येच्या गटात ( सातारा) पाचगणी नगरपालिका आणि ( कोल्हापूर)पन्हाळा नगरपालिका या शहरांनी सुपर स्वच्छ लीगमध्ये स्थान मिळवले. (पुणे जिल्हा) पिंपरी–चिंचवड महानगरपालिकेने देशात सातवा तर राज्यात प्रथम क्रमांक मिळवला.

तसेच ७ स्टार गार्बेज फ्री सिटी आणि वॉटर प्लस ही दोन्ही मानांकनंही मिळवली आहेत. नगर विकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी महानगरपालिका, नगरपालिकांच्या टीमसह पुरस्कार स्वीकारले.महाराष्ट्राने कचरा व्यवस्थापन, स्रोत पातळीवरील विलगीकरण, नागरिकांचा सक्रिय सहभाग आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरातून स्वच्छतेच्या दिशेने उल्लेखनीय कार्य केले आहे. मिरा भाईंदरने अत्याधुनिक कचरा व्यवस्थापन प्रणाली, मशीनद्वारे कचरा संकलन आणि नागरिकांमध्ये जनजागृती घडवून हे यश संपादन केले. पिंपरी–चिंचवडने कचरा मुक्त शहर व वॉटर प्लस प्रमाणपत्र मिळवून आपली गुणवत्ता सिद्ध केली.

## Change In Name

My Old Name is MOHAMMAD SHAKKELAHMED which now I am changing as New Name MD SHAKKELAHMED Hence forth My All Correspondence will be done as per my new name. Please consider the same. ADD-AIRPORT ROAD NEAR RAILWAY DIVISION ASRA NAGAR NANDED 431605 MAHARASHTRTA INDIA MO.8149712304

## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.



संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८

## जाहीर प्रगटन

हिमायतनगर येथील दिवाणी न्यायाधीश व. स्तर हिमायतनगर यांच्या न्यायालयात,किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२९ /२०२५
पु.ता.२५/४/२०२५

अर्जदार–१.पद्मीनीबाई भ्र.गणपत तमनवाड वय–७० वर्षे, व्यवसाय–घरकाम २. मारोती पि.गणपत तमनवाड ,वय–५१ वर्षे,व्यवसाय शेती ३.तानाजी पि.गणपत तमनवाड वय ४८ व्यवसाय शेती ४.शिवाजी पि.गणपत तमनवाड वय ४५ वर्षे व्यवसाय शेती १ ते ४ रा.सिरंजणी ता.हिमायतनगर जि.नांदेड ५.शोभाबाई भ्र.माधव गुंडेवाड वय ५५ वर्षे व्यवसाय घरकाम –रा.इस्लापूर ता.किनवट जि.नांदेड

विरुध्द

गैरअर्जदार– निरंक

मुंबई विनिमय कायदा १८२७ नुसार मयत गणपत पि.तानाजी तमनवाड यांच्या मृत्यूपश्चात अर्जदार यांना वारस म्हणून वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी मा. न्यायालयात अर्ज दाखल केला असून अर्जदाराचे असे कथन आहे की, गणपत पि.तानाजी तमनवाड यांचा मृत्यू दिनांक १२/१/२०२३ रोजी मौजे सिरंजणी ता.हिमायतनगर जि.नांदेड येथे मयत आहेत.गणपत पि.तानाजी तमनवाड हे रा.सिरंजणी ता.हिमायतनगर जि.नांदेड येथील रहिवाशी होते.मतयांच्या पश्चात अर्जदार हे सध्या मौजे सिरंजणी ता.हिमायतनगर जि.नांदेड कायदेशीर वारस म्हणून वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्जदार यांनी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

तरी, उपरोक्त प्रकरणी सर्व संबंधितास कळविण्यात येते की, वरील अर्जदारांच्या नावे वारसा प्रमाणपत्र देणे बाबत कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी तो लेखी स्वरूपात स्वतः हजर राहून अथवा त्यांचे विधिज्ञ यांचे मार्फत ३० दिवसात या न्यायालयात सादर करावा. अन्यथा कोणासही कांही आक्षेप / उजर नाही असे समजुन प्रकरणात पुढील कायदेशीर आदेश निर्गमीत करण्यात येतील.

आज दि.१२ मार्च, २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्याने देण्यात आले.

**आदेशावरून**

**क.लिपीक** **सहा.अधिक्षक**

**सह दिवाणी न्यायालय क.स्तर हिमायतनगर**

## जाहीर प्रगटन

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,नांदेड विभाग नांदेड*

### चौकशीची जाहीर नोटीस

फेरफार अहवाल/अर्ज क्रमांक. एन एन डी/ २७९७२/१८६०/२४ सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक श्री संत. फुलाजी बाबा बहुउद्देशीय सेवाभावी संस्था कुपटी बु. ता. किनवट जी. नांदेड बाबत. न्यासाचा पत्ता: घर नं. १५०, कुपटी बु. ता. किनवट जी. नांदेड . अर्जदार– शिवशंकर नारायण वानोळे

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहाय्यक धर्मदाय आयुक्त नांदेड हे वर नमूद केलेला अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्द्यावर चौकशी करणार आहेत.

१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरूपाचा आहे काय?

२) खालील निर्देष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय?

अ) जंगम मिळकत:– रोख रुपये १०५७/– मात्र

ब) स्थावर मिळकत:– रोख रुपये. /(छळश्र)

सदरच्या चौकशी प्रकरणांमध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा द्यावयाचा असेल त्यांनी त्याची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत या कार्यालयात वरील पत्त्यावर मिळेल अशा रीतीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफेत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझ्या सहिनिशी व मी सहाय्यक धर्मदाय आयुक्त नांदेड, विभाग नांदेड यांच्या शिक्यानिशी आज दिनांक ३०/०६/२०२५ रोजी दिली.

**स्वाक्षरीत**
**(पि.ज. रॉय)**
**अधीक्षक (न्याय शाखा)**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, नांदेड विभाग, नांदेड**

## जाहीर प्रगटन

मी अडवोकेट आसिफ खान पि.अल्ताफ इलाही खान, रा. निजाम कॉलनी ता.जी. नांदेड सर्व जनतेस व संबंधितांना या जाहीर प्रगटन व जाहीर आक्षेप द्वारे कळवितो कि दि. १६ जुलै २०२५ रोजी माझे वडील व पक्षकार अल्ताफ इलाही खान पि. अहमद खान जे वयवृद्ध नागरिक आहे यांच्या नावाने दिलेला जाहीर आक्षेप मला ना विचारता देण्यात आलेले आहे व त्या मध्ये चुकीचे नमूद केलेले आहे कि कसल्याही प्रकारचा अधिकार माहिती व कागदपत्रे नसतांना दि. ११ जुलै २०२५ रोजी मी जाहीर प्रगटन व जाहीर आक्षेप त्यांच्या नावाने दिलेले आहे. उलट दि. १६ जुलै २०२५ रोजी देण्यात आलेला जाहीर आक्षेप प्रॅक्टिसिंग वकील मार्फत ना देता माझे वडील जे ८२ वर्षांचे वय वृद्ध आहे त्यांचे जुने लेटरपॅड वापरून देण्यात आलेले आहे. दि. ११ जुलै २०२५ रोजी दै. गोदातीर व दै. वरकेताजा मध्ये मी दिलेले जाहीर प्रगटन व जाहीर आक्षेप अल्ताफ इलाही खान पि. अहमद खान यांचा मुलगा म्हणून व दिवाणी व फौजदारी व महसूल न्यायालयात व उच्च न्यायालयात विविध प्रकरणात त्यांचा वकील असल्याचे अधिकाराने देण्यात आलेले होते व ते खरे व बरोबर आहे. त्यात असे कुठेही नमूद करण्यात आलेले नाही कि आरिफ खान व इरफान खान या दोघांनी माझे व त्यांचे वडील अल्ताफ इलाही खान यांना शारीरिक इजा पहोचविलेले आहे. माझे वडील व पक्षकार अल्ताफ इलाही खान पि. अहमद खान हे शासकीय सेवेतून सेवा निवृत्त झालेले पेन्शनर आहे वकील म्हणून त्यांची नोंदणी असले तरी ते ८२ वर्षांचे वयवृद्ध असल्याने प्रॅक्टिसिंग वकील नाही म्हणून त्यांचे वकिलीचे जुने लेटरपॅडच्या गैरवापर होण्याची शक्यता पासून व त्याच्या कायदेशीर परिणामां पासून सावध राहावे. तसेच माझे थोरले भाव व अल्ताफ इलाही खान यांचा ऑस्ट्रेलिया स्थित थोरला मुलगा आरिफ खान यांनी दि. १२ जुलै २०२५ रोजी दै. श्रमिक एकजूट मध्ये जाहीर खुलासा देऊन हे स्पष्ट केलेले आहे कि दि. २० जुन २०२५ व ०५ जुलै २०२५ रोजी जे जनरल पावर आफ़ अटार्नी–GPA क्र. २६५३/२००२ रद्ध करण्याबाबत त्यांनी जे जाहीर प्रगटन दिलेले होते ते गैर–समजुतीने दिलेले होते व त्यांनी दिलेले GPA क्र. २६५३/२००२ हे कायम आहे.. म्हणून GPA क्र. २६५३/२००२ बद्दल कोणताही वाद आपसात राहिलेला नाही. तरी या जाहीर प्रगटन व जाहीर आक्षेप द्वारे सर्व जनतेस व संबंधितांना वर नमुद तथ्य कळविण्यात येते. सबब हे जाहीर प्रगटन व जाहीर आक्षेप दि.१८/०७/२०२५.

**जाहीर प्रगटन देणार:**
**ॲड. आसिफ खान पि.अल्ताफ इलाही खान.**
**मो. ९१३०४४९४००**

## जाहीर प्रगटन

(भोकर येथील दिवाणी न्यायाधीश क. स्तर, भोकर यांचे न्यायालयात श्री. रवि शिवाजीराव इरले २ रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, भोकर दिवाणी किरकोळ अर्ज क्र. १५७/२०२५

अर्जदार – १. बालाजी पि.अडेलू कांबळे वयः ५८ वर्षे, धंदा : मजुरी २. कोंडीबा पि.अडेलू कांबळे वयः ५० वर्षे, धंदा : मजुरी ३. गोपिनाथ पि.अडेलू कांबळे वयः ४० वर्षे, धंदा : मजुरी सर्व रा.बटाळा ता.भोकर जि.नांदेड ४ गयाबाई भ्र.शंकर जळपते वयः६५ वर्षे, धंदा :घराकम रा.पोटा ता.हिमायतनगर जि.नांदेड ५.आनंदाबाई भ्र.देविदास भालेराव वयः४५ वर्षे, धंदा :घराकम रा.देविशी ता.भोकर जि.नांदेड सध्या रा.रविनगर भैसा मंडळ जि.निर्मल

विरूध्द –

गैरअर्जदार–निरंक

विषय –कलम ३ मुंबई रेग्युलेशन ॲक्ट VIII १८२७ कायद्याप्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी वर नमुद अर्जदार यांनी या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी दिवाणी किरकोळ अर्ज केला आहे की,मयत ही अर्जदार क्र.१ ते५ यांची आई आहे अर्जदार क्र.१ ते ३ हे मुले व अर्जदार क्र.४ ते ५ या मुली आहेत. मयत नामे जिजाबाई भ्र.आडेलू कांबळे या दिनांक २९/१२/२०१६ रोजी बटाळा ता.भोकर जि.नांदेड येथे मयत झाल्या. अर्जदार क्र.१ ते ५ हेच मयत नामे जिजाबाई भ्र.आडेलू कांबळे यांचे कायदेशीर वारस आहेत. असे वारसाचे म्हणणे आहे.

मयत नामे जिजाबाई भ्र.आडेलू कांबळे यांचे अर्जदार हाच त्यांचे कायदेशीर वारस आहेत.हे वारसा प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाचा उजर अथवा आक्षेप असल्यास त्यांनी स्वतः अगर वकीलामार्फत हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर होवुन आपले लेखी म्हणणे सादर करावे. अन्यथा त्यानंतर कोणाचाही आक्षेप नाही, असे समजुन अर्जदारातर्फे एकतर्फी निर्णय दिला जाईल. याची नोंद घ्यावी.आज दिनांक १५ जुलै २०२५ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

**आदेशावरून**

**क.लिपीक** **सहाय्यक अधिक्षक**

**दिवाणी न्यायालय क.स्तर भोकर**

## जाहीर प्रगटन

एस. एम. कोळेकर दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, धर्माबाद यांचे न्यायालय दिवाणी किरकोळ अर्ज (आर. जे.ई.) क्र. ७३/२०२५

सुलोचना भ्र.किशन शिंदे विरुध्द धुरपतबाई भ्र.बापुजी शिंदे

अर्जदार : १) सुलोचना भ्र.किशन शिदे वय ३२ वर्ष, धंदा घरकाम २) बापुजी पि.किशन शिदे, वय २१ वर्ष, धंदा – शिक्षण,दोघे रा.पुलेनगर धर्माबाद ता.धर्माबाद जि.नांदेड

विरुध्द –धुरपतबाई भ्र.बापुजी शिंदे वय ७२ वर्षे धंदा पेन्शर व घरकाम सध्या रा.कोटलगाव ता.भैसा जि.अदिलाबाद

प्रकरण –बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ कलम २ व ३ नुसार अर्जदार यांना कायदेशीर वारसा प्रमाणपत्र Legal Heirship Certificate प्रदान करणे,

मयत किशन कृष्णाजी पि.बापुजी शिंदे यांचे दिनांक २१/२/२०११ रोजी निधन झाले.

सदरील जाहीर प्रगटणाद्वारे सर्व संबंधिताना कळविण्यात येते की, वर दर्शविण्यातआल्याप्रमाणे प्रस्तुत प्रकरणातील अर्जदार क्र. १ व २ हे मयताचे वारस असून त्यांच्या व्यतिरिक्त इतर कोणीही वारस नसल्यामुळे त्यांना मयत किशन कृष्णाजी पि.बापुजी शिंदे यांचे कायदेशीर वारस असल्याचे घोषीत करण्यासाठी या न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन कायदा १८२७ कलम २ व ३ अन्वये हिअरशीप प्रमाणपत्र मिळणे बाबतचा अर्ज त्यांचे वकील ॲड. हाडोळीकर एस.बी. यांचे मार्फत दाखल केला आहे. सदरील प्रमाणपत्र हे शासकीय व खाजगी कामांसाठी आवश्यक असल्याबाबत नमुद केले आहे.

हे की प्रस्तुत प्रकरणात वरील बाबत कोणास काही आक्षेप, तक्रार अथवा उजर असल्यास त्यांनी त्याबाबतचे आपले म्हणणे सदरील जाहिर प्रगटन प्रकाशित झाल्यापासुन विहित मुदतीच्याआत या न्यायालयात लेखी स्वरुपात दाखल करावे अन्यथा या बाबत कोणास कसल्याही प्रकारचा आक्षेप, तक्रार अथवा उजर नाही असे गृहित धरुन नियमाप्रमाणे प्रस्तुतचे प्रकरण निकाली काढण्यात येईल. आज दिनांक १५ /७ / २०२५ रोजी माझ्या सहिनिशी व न्यायालयाच्या शिक्यानीशी दिला

**आदेशावरून**

**क.लिपीक** **सहा.अधिक्षक**

**सह दिवाणी न्यायालय क.स्तर धर्माबाद**

## जाहीर प्रगटन

सर्व संबंधीत व्यक्ती संस्था आणि सर्वसामान्य जनतेस खालील प्रमाणे कळविण्यात येते आहे की, आमचे पक्षकार सौ.जयश्री लक्ष्मणराव मुकुलवार रा.हनुमान हिपरगा ता.देगलूर जि.नांदेड यांनी दिलेल्या माहिती, अधिकारपत्र, आणि कायदेशीर प्रगटनाद्वारे मालमत्तेच्या प्रस्तावित विक्रीसंदर्भात सर्वांना सुचित करण्याचा हेतु आहे.श्री. विश्वदीप रामचंद्र रोडे, रा.रामनगर नविन जालना ता.जि. जालना यांच्या मालकीची पुढील प्रमाणे अचल मालमत्ता आहे. मौजे नांदेड मनपा हद्दीतील सर्व्हे नंबर १४५/१ पैकी विठ्ठलनगर ग्रुप ए मधील प्लॉट नंबर त्यावरील आर सी सी बांधकाम असलेले घर, ज्याची एकूण लांबी पुर्व पश्चिम ४० फुट म्हणजे १२.१९ मीटर व रूंदी दक्षिण उत्तर ३० फुट म्हणजे ९.१४ मीटर ज्याचे एकूण क्षे.१२०० चौरस फुट म्हणजे १११.५२ चौरस मीटर आहे.

सदर मालमत्तेची चर्तु सीमा पुढीलप्रमाणे आहे पूर्वेस – सदरील सर्व्हे नंबर पैकी बी ग्रुपधमील प्लॉट नबर २ पश्चिमेस – १५ फुट रुंद सार्वजनिक रस्ता,दक्षिण–सदरील सर्व्हे नंबर पैकी ए ग्रुपधमील प्लॉट नबर २१ आहे. उत्तरेस : सदरी सर्वे क्र. पैकी ए ग्रुप मधील प्लॉट क्र. १९ आहे.

श्री. विश्वदीप रामचंद्र रोडे यांनी वरील वर्णित प्लॉट बांधकामासह आमचे पक्षकार यांच्यासोबत कायमस्वरूपी विक्री करण्याचा नोंदणीकृत लेखी करार केलेला आहे. सदर करार हा दोन्ही पक्षकाराद्वरे परस्पर संमतीने आणि कायदेशीर अटी व शर्तीचे पालन करून निश्चित यात आला आहे. या कराराच्या अटींनुसार इसारा रक्कम अदा केलेली आहे, जी दराच्या प्रामाणिकपणा आणि कायदेशीर बांधिलकीचे प्रतीक आहे.

सदर मालमत्तेवर कोणात्याही व्यक्तीचा, संस्था, बँका, वितीय संस्था, अथवा इतर कोणी पक्षाचा कसल्याही प्रकारचा हक्क, बोजा, कर्ज, तारण, कायदेशीर दावा, तक्रार, आश्रय, अथवा वाद असल्यास संबंधीत व्यक्ती/संस्थेने खालीलप्रमाणे आक्षेप नोंदवावेत,

हे जाहीर प्रगटन वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून सात (७) दिवसाच्या आत सदरील आक्षेप हा लेखी स्वरूपात, स्पष्ट आणि तपशीलवार असावा, या सोबत संबंधित कार्यदेशीर दस्ताऐवज, मालमत्ते संबंधित हक्क दर्शविणारी कागदपत्रे, आणि आक्षेप कर्त्याची ओळख आणि पत्याचा पुरावा जोडावा. सदरील आक्षेप हा आमचे कार्यालयात नोंदवावा व विहित सात (७) दिवसाच्या मुदतीनंतर प्राप्त होणाऱ्या कोणत्या कायदेशीर दखल घेतली जाणार नाही, जर मुदतीत कोणताही कायदेशीर आक्षेप प्राप्त झाला नाही तर आमचे पक्षकार मालमत्तेची नोंदणीकृत विक्री दस्त (खरेदीखत) दुय्यम निबंधक कार्यालय, नांदेड येथे कायदेशीर पद्धतीने नोंदणीकृत करून घेतील. सदर मालमत्तेशी संबंधित कोणत्याही बोला, हक्क, अथवा आपली माहिती स्वर्गवास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित व्यक्ती/संस्थेची राहील, सदर मालमत्ता कोणत्याही कायदेशीर वादविवाद, तारण, कर्ज, अथवा इतर कोणत्याही बोजापासून मुक्त असल्याची खात्री विक्रेता पक्षाने दिलेली आहे. तथापि, हे जाहीर प्रगटन सर्व संबंधितांना त्यांचे हक्क/आक्षेप नोंदविण्याची अंतिम संधी प्रदान करते,

हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध करण्याचा मुख्य उद्देश हा आहे की, सदर मालमतेच्या विक्री व्यवहारा कार्यदेशीर पारदर्शकता प्रदान करणे, सर्व संबंधित पक्षांना त्यांचे हक्क/ आक्षेप नोदविण्याची संधी देणे, आणि प्रस्तावित विक्री व्यवहार पूर्णपणे कायदेशीर आणि वादविवादमुक्त असल्याची खात्री करणे, आमचे पथकार हा व्यवहार पूर्ण कायदेशीर मार्गाने आणि सर्व नियमांचे पालन करून पूर्ण करण्यास कटिबद्ध आहेत. सदर मालमतेशी संबंधित कोणत्याही माहितीसाठी, आक्षेप नोंदणीसाठी, अथवा कायदेशीर सल्ल्यासाठी खालील पत्यावर संपर्क साधावा.

**मार्फत**
**ॲड.श्रीकांत ए.नेवरकर**
**गोदावरी नगर, जैन मंदिर, तरोडा खु, नांदेड**
**मो. ९८६०२०६१४४, ७०८८४३०८३८**

## टी.सी हरवली

माझी सुशांत कैलासराव तुंबलवाड या नावाची ९ वी पास–ची टी.सी.जुना मोंढा ते लोहा बस प्रवासा दरम्यान हरवली आहे. कोणाला सापडल्यास खालील नंबर साधावा. **–संपर्क पत्ता.– सुशांत कैलासराव तुंबलवाड रा.इतवारा हनुमान पेठ नांदेड मो.८३२९९३८९७९**

## जाहीर प्रगटन

(भोकर येथील दिवाणी न्यायाधीश क. स्तर, भोकर यांचे न्यायालयात श्री. रवि शिवाजीराव इरले २ रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, भोकर दिवाणी किरकोळ अर्ज क्र. १२०/२०२५

अर्जदार – १. सुमन भ्र.रमेश कदम वयः ६५ वर्षे, धंदा : घरकाम रा.टेळकी ता.लोहा जि.नांदेड

विरूध्द –

गैरअर्जदार–शाखा व्यवस्थापक नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.शाखा भोकर ता.भोकर जि.नांदेड

विषय –भारतीय वारसा कायद कलम ३७२ प्रमाणे वारसा प्रमाणप मिळणे बाबत.

ज्याअर्थी वर नमुद अर्जदार यांनी या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी दिवाणी किरकोळ अर्ज केला आहे की,मयत ही अर्जदार यांचे पती आहेत.मयत नामे रमेश संभाजीराव उर्फे संभाराव कदम हे दिनांक ३१/३/२००९ रोजी भोकर ता.भोकर जि.नांदेड येथे मयत झाले अर्जदार हेच मयत नामे रमेश संभाजीराव उर्फे संभाराव कदम यांचे कायदेशीर वारस आहेत. असे वारसाचे म्हणणे आहे.

मयत नामे रमेश संभाजीराव उर्फे संभाराव कदम यांचे अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत.अर्जदारांना मयत नामे रमेश संभाजीराव उर्फे संभाराव कदम यांचे बचत खाते क्र ११२७१०००७०३६२२९ मध्ये गैरअर्जदार शाखा व्यवस्थापक नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.शाखा भोकर ता.भोकर जि.नांदेड यांच्याकडे जमा रक्कम ४२८९८ रूपये रक्कम काढणे कामी वारसा हक्क प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

हे वारसा प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाचा उजर अथवा आक्षेप असल्यास त्यांनी स्वतः अगर वकीलामार्फत हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर होवुन आपले लेखी म्हणणे सादर करावे. अन्यथा त्यानंतर कोणाचाही आक्षेप नाही, असे समजुन अर्जदारातर्फे एकतर्फी निर्णय दिला जाईल. याची नोंद घ्यावी.आज दिनांक १६ जुलै २०२५ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

**आदेशावरून**

**क.लिपीक** **सहाय्यक अधिक्षक**

**दिवाणी न्यायालय क.स्तर भोकर**

## एज्युकेशन सोसायटी नायगांव बा.संचलीत जनता हायस्कुल नायगांव बा. ता.नायगांव (खै) जि. नांदेड

## पाहिजेत

आमच्या जनता हायस्कुल नायगाव बाजार येथील अनुदानित माध्यमिक विभागात कनिष्ठ लिपीक–१ पदासाठी रिक्त जागा भरावयाची आहे.तेंव्हा मुलाखतीस येणाऱ्या उमेदवारांनी मुळ कागपत्रानिशी दिनांक २५/७/२०२५ रोज शुक्रवार सकाळी ठिक ११.०० वाजता जनता हायस्कुल नायगाव बाजार ता.नायगांव (खै.)जि.नांदेड येथे स्वखर्चाने उपस्थितीत रहावे

| अ.क्र. | पदनाम | प्रवर्ग | अनुदानित प्रकार | शैक्षणिक पात्रता | पदसंख्या |
|---|---|---|---|---|---|
| १ | कनिष्ठ लिपीक | एस.ई.बी.सी | १०० टक्के अनुदातिनत | १२ वी पास टायपींग मराठी इंग्रजी उत्तणी | १ |

**नोट –**मुलाखतीचे स्थळ जनता हायस्कुल नायगाव क.म.वि शेळगाव रोड नायगाव बा.मुलाखतीस येथे वेळेस उमेदवाराचे मुळ कागदपत्रे व स्वखर्चाने उपस्थित रहावे

सचिव अध्यक्ष

**शालेय समिती जनता हायस्कुल नायगाव बा.नायगांव (खै) जि.नांदेड**

## Change In Name

My Old Name is GARUDKAR BALAGIRAO which now I am changing as New Name BALAJI NARAYANRAO GARUDKAR Hence forth My All Correspondence will be done as per my new name. Please consider the same.
SIGN BY-BALAJI NARAYANRAO GARUDKAR
CURRENT ADD-P.N.41 BHAGYASHRI SOCIETY SHRIRAM CHAUK VASARNI NANDED 431603 MO.9421756185

## Change In Name

My Old Name is GURPRRET SINGH KAMTHEKAR which now I am changing as New Name SARDAR GURPRRET SINGH ANMOL SINGH KAMTHEKAR Hence forth My All Correspondence will be done as per my new name. Please consider the same.
ADD-NAVA MONDHA NEAR VITTHAL MANDIR NANDED MO.9890881997

## Change In Name

My Old Name is ANMOL SINGH KAMTHEKAR which now I am changing as New Name SARDAR ANMOL SINGH SHER SINGH KAMTHEKAR Hence forth My All Correspondence will be done as per my new name. Please consider the same.
ADD-NAVA MONDHA NEAR VITTHAL MANDIR NANDED MO.9890881997

## Change In Name

My Old Name is PARSEWAR SANTOSHKUMAR PURUSHOTTAM which now I am changing as New Name PARSEWAR SANTOSH PURUSHOTTAMRAO Hence forth My All Correspondence will be done as per my new name. Please consider the same.
SIGN BY-PARSEWAR SANTOSH PURUSHOTTAMRAO R/O FLAT NO 211 RAJ RESIDENCY -C SHARDA NAGAR NANDED Tq.Dist Nanded 431601 MO.9420847880

## Change In Name

My Old Name is GARUDKAR SHREYASH BALAGIRAO which now I am changing as New Name SHREYASH BALAJI GARUDKAR Hence forth My All Correspondence will be done as per my new name. Please consider the same.
SIGN BY-SHREYASH BALAJI GARUDKAR
CURRENT ADD-P.N.41 BHAGYASHRI SOCIETY SHRIRAM CHAUK VASARNI NANDED 431603 MO.7887966981

स्थलांतर
सिटी मॅक्स डिजिटल कलर
मो.7058766021,9422185282
गड्डम मार्केट,पहिला मजला,
शिवाजी नगर,नांदेड

गोदातीर समाचार

पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस
हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...

किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकूण, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.
पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308



# शासकीय काटे विकेंद्रीकरण पद्धतीने उभारा –आ. आनंद बोंढारकर



**नांदेड (प्रतिनिधी)** – मराठवाड्यातील शेतकऱ्यांच्या उत्पादित मालाला हमीभाव मिळत नाही अशी खंत व्यक्त करीत शेतकऱ्यांच्या उत्पादित मालाच्या खरेदीसाठी विकेंद्रीय पद्धतीने शासकीय काटे उभारण्यात यावेत, अशी मागणी आ. आनंदराव बोंढारकर यांनी गुरुवारी विधानसभेत केली.

पावसाळी अधिवेशनाच्या आजच्या कामकाजात नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघाचे शिवसेनेचे आ. आनंदराव बोंढारकर यांनी शेती आणि शेतकऱ्यांच्या अत्यंत जिव्हाळ्याचे प्रश्न सभागृहात मांडले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लक्ष देऊन शेतकऱ्यांचा उत्पादित माल शासकीय खरेदीसाठी प्रभावी उपाययोजना व्हावी या अनुषंगाने प्रयत्नशील आहेत. मात्र मराठवाड्यातील शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या शेतीमालाला हमी भावाप्रमाणे खरेदी झाली पाहिजे यासाठी जास्तीत – जास्त शासकीय खरेदी खते विकेंद्रीय पद्धतीने उभे करून शेतकऱ्यांचा उत्पादित माल खरेदी करण्यात यावा, त्यांच्या आर्थिक भरभराटीसाठी राज्य सरकारने तातडीने उपाययोजना कराव्यात, असा प्रश्न त्यांनी गुरुवारी सभागृहात लावून धरला होता. या अनुषंगाने लवकरच कृषी मंत्रालय आणि कृषिमंत्री निर्णय घेतील, अशी माहिती विधानसभेत देण्यात आली. आ. आनंद बोंढारकर यांच्या पुढाकारामुळे शेतकऱ्यांना न्याय मिळेल अशी आशा व्यक्ते केली जात आहे.

# विकसित महाराष्ट्र २०४७ सर्वेक्षणासाठी नागरिकांना सहभाग घेण्याचे आवाहन

**नांदेड (प्रतिनिधी)**– भारत सरकारच्या विकसित भारत–२०४७ या दूरदृष्टी कार्यक्रमाच्या अनुषंगाने महाराष्ट्र सरकारने विकसित महाराष्ट्र–२०४७ ही महत्त्वाकांक्षी योजना हाती घेतली आहे. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व विविध खात्यांचे मंत्री यांच्या नेतृत्त्वाखाली सर्व जिल्ह्यांमध्ये जनतेचा सहभाग घेऊन व्यापक चर्चासत्रे आयोजित केली जाणार आहेत. जनतेच्या सूचना, गरजा व अपेक्षा लक्षात घेऊन सदर व्हिजन डॉक्यूमेंट तयार केले जाणार आहे. या सर्वेक्षणात नांदेड जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी https://wa.link/o93s9m या लिंकवर आपले मत नोंदवावे, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी जयकुमार टेंभरे यांनी केले आहे.

विकसित महाराष्ट्र–२०४७ करिता व्हिजन डॉक्यूमेंट तयार करण्याच्या अनुषंगाने नियोजन विभागाच्या २ जून २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये सुचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. त्यामध्ये दिनांक ६ मे ते २ ऑक्टोबर २०२५ अशा १५० दिवसांच्या कार्यक्रमाची घोषणा करण्यात आलेली आहे. या संकल्पनेच्या माध्यमातून संपूर्ण महाराष्ट्रासाठी Vision Document तयार केला जात आहे. ज्यामध्ये कृषी व संलग्न क्षेत्र, उद्योग व सेवा, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, प्रशासन व पर्यावरणीय इत्यादी क्षेत्रांच्या क्षेत्रनिहाय अभ्यास समित्या गठीत करण्यात आलेल्या आहेत, अशी माहिती जिल्हा क्रीडा अधिकारी जयकुमार टेंभरे यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.

# रस्ता सुरक्षा लोकसंवाद सामाजिक चळवळ होणे गरजेचे –सहाय्यक परिवहन अधिकारी दरगोडे

**नांदेड(प्रतिनिधी)** – रस्ता सुरक्षा लोकसंवाद सामाजिक चळवळ होणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन सहाय्यक परिवहन अधिकारी आशिष दरगोडे यांनी केले. प्रादेशिक परिवहन कार्यालय नांदेड व जवाहरलाल नेहरू समाजकार्य महाविद्यालय सिडको नवीन नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयात रस्ता सुरक्षा अभियान कार्यक्रम प्रसंगी ते बोलत होते.

यावेळी सहाय्यक परिवहन अधिकारी आशिष दराडे यांनी राज्य रस्ता सुरक्षा अभियान २०२५ अंतर्गत 'हेल्मेट युक्त अपघात मुक्त गाव अभियान' संकल्पनेतून रस्ता सुरक्षा लोकसंवाद कार्यक्रमाच्या सुरुवातीस उपस्थित सर्व मान्यवरांना रस्ता सुरक्षा जनजागृतीची मार्गदर्शिका पुस्तक भेटरुपी देऊन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. नांदेड जिल्ह्यात दिवसाला पाचशेच्या आसपास अपघात होतात. जिल्ह्यातील केवळ पाच टक्के लोक रस्ता सुरक्षा नियमांचे व वाहन कायद्याचे पालन करतात. ही बाब अत्यंत चिंताजनक असून, या सर्व विषयाचा गांभीर्याने विचार करण्याची अत्यंत गरज आहे. त्यामुळे रस्ता सुरक्षा विषयी गावागावांत लोकसंवाद घडून आणणे आणि जनजागृती व प्रबोधन करताना रस्ता सुरक्षा लोकसंवाद हा विषय सामाजिक चळवळ होणे गरजेचे असून, यासाठी सबंध युवकांनी पुढाकार घ्यावा. या कार्यक्रमात कै. गणपतराव पाटील बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेने पुढाकार घेतला. राज्यामध्ये हेल्मेट सक्तीचा कायदा असूनसुद्धा लोक हेल्मेट वापरत नाहीत, चार चाकी वाहन चालवताना सीट बेल्टचा वापर करत नाहीत.

रस्ता सुरक्षा हा विषय जिल्हा स्तरावरील नियोजन विभागाने गांभीर्याने घ्यावा आणि त्यासाठी पूरक निधी उपलब्ध करून रस्त्यावरील नामनिर्देशक फलक आणि इतर रस्ता सुरक्षा विषयी लागणाऱ्या सुखसोई उपलब्ध करून द्याव्यात. बालपणातच संस्कार होण्यासाठी रस्ता सुरक्षा हा विषय अभ्यासक्रमातही समाविष्ट केला पाहिजे, असे मत नांदेड जिल्हा परिषदेचे माजी जिल्हा परिषद सदस्य आनंद गुंडीले यांनी आपल्या भाषणात व्यक्त केले. वाहतूक नियमाचे पालन करणे गरजेचे आहे, असे मत प्राचार्य डॉ. एन. जी. पाटील यांनी आपल्या अध्यक्ष भाषणात व्यक्त केले.

# खा. चव्हाण यांची भोकर व मुदखेडसाठी रेल्वे पादचारी पुलाची मागणी



**भोकर (प्रतिनिधी)** – माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांनी भोकर व मुदखेड येथे रेल्वे पादचारी पुलाची (एफओबी) मागणी केली आहे. या संदर्भात त्यांनी राज्य सरकारला पत्र दिले आहे.

भोकर शहरात रेल्वे उड्डाण पूल व मुदखेड शहरात रेल्वे भुयारी मार्ग झाल्याने रेल्वे विभागाने त्या ठिकाणी असलेले रेल्वे दरवाजे बंद केले आहेत. सदर रेल्वे उड्डाण पूल आणि भुयारी मार्गामुळे दोन्ही शहरांचे दोन भाग झाले आहेत. त्यामुळे शहराच्या एका भागातून दुसऱ्या भागात पायी जाणाऱ्या नागरिकांना अडचण निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर भोकर व मुदखेड येथे अनुक्रमे उड्डाण पूल आणि भुयारी मार्गानजिक तसेच दोन्ही शहरातील रेल्वे यार्ड परिसरात रेल्वे पादचारी पुलाचे बांधकाम करणे आवश्यक झाले आहे. या पार्श्वूभमीवर माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांनी भोकर व मुदखेड शहरातील रेल्वे पादचारी पुलाला मंजुरी देऊन निधी उपलब्ध करुन देण्याची मागणी केली आहे.



**बसस्थानकासाठी बैठक**– नांदेड येथे सांगवी विमानतळ परिसरात होणाऱ्या अद्ययावत नवीन वातानुकूलित बसपोर्ट बस स्थानकाबाबत गुरुवारी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक आणि नांदेड उत्तरचे आमदार बालाजीराव कल्याणकर यांच्या उपस्थितीत बैठक घेण्यात आली. या संदर्भात जिल्हाधिकारी राहुल कर्डिले आणि महापालिका आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे तसेच एसटी महामंडळाच्या स्थानिक अधिकाऱ्यांशी व्हीडरओ कॉन्फरन्सिंगद्वारे संवाद साधला. हे बसपोर्ट उभारण्यासाठी सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन राज्याचे परिवहनमंत्री सरनाईक यांनी यावेळी दिले. (छाया–करणसिंह बैस)




**मुंबई** –महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेच्या महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्षपदी दीपक स्वामी यांची निवड करण्यात आली आहे. अमित राज ठाकरे यांच्या हस्ते त्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले.

# गांजासह सव्वाचार लाखांचा मुद्देमाल जप्त; एकाला अटक, शिवाजीनगर पोलिसांची कारवाई

**नांदेड (प्रतिनिधी)** – शहराच्या शिवाजीनगर दातार चौक परिसरात अवैधरित्या विनापरवाना गांजा विक्री करणाऱ्या आरोपीला शिवाजीनगर पोलिसांनी अटक केली. यावेळी त्याच्याकडून १ लाख १८ हजार रुपयांचा साडेचार किलो गांजा आणि तीन लाख रोख रक्कम असा चार लाख १८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.



पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी ऑपरेशन फ्लश आऊट अंतर्गत अवैध धंद्यावर छापा कार्यवाही करण्याबाबत सर्व पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी यांना आदेशीत केले होते. त्यानुसार दि. १५ जुलै रोजी गुप्त माहिती मिळाली की, दातारचौक, शिवाजीनगर येथे एक युवक त्याच्या जवळील पिशवीमध्ये गांजा बाळगून आहे. त्यावरून शिवाजीनगर ठाण्याचे पोलीस निरीक्षक राजेश पुरी यांनी आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना माहिती दिली. त्यानंतर ते स्वतः, पोलीस उपनिरीक्षक पंकज इंगळे, कदम यांना सोबत घेऊन कारवाई केली. दोन पंच, वजन मापे निरीक्षक तसेच फोटोग्राफर यांना बोलावून घेवून माहिती दिलेल्या ठिकाणी जावुन पाहणी केली असता तेथे एक युवक हा एका पिशवीसह बसलेला दिसला. तो पथकाला पाहून त्याच्या घरामध्ये पळाला.

सदर पथकाने त्याचा पाठलाग करुन ताब्यात घेवून त्याचे नाव विचारले असता त्याने त्याचे नाव शेख अनिस शेख सलीम (वय ३२ वर्षे रा. दातार चौक, शिवाजीनगर, नांदेड) असे सांगितले. सदर आरोपीच्या घरातून ४.५२७ किलो ग्रॅम वजनाचा गांजा (किंमत १ लाख १३ हजार १७५ रुपये) व नगदी ३ लाख ५ हजार ४०० रुपये असा ४ लाख १८ हजार ५७५ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. शिवाजीनगर पोलीस ठाण्यात शेख अनिसविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# हदगावमध्ये एक लाखाची बॅग लिफ्टिंग; अज्ञात चोरट्यावर गुन्हा दाखल

**नांदेड (प्रतिनिधी)** – हदगाव येथील एसबीआय बँकेतून काढलेले एक लाख रुपये अज्ञात चोरट्यांनी चोरून नेले. ही घटना १५ जुलै रोजी दुपारी दोनच्या सुमारास भाजी मंडई हदगाव येथे घडली.



हदगाव तालुक्यातील पळसा येथे राहणारे शेतकरी देवानंद किशनराव निमडगे (वय ३५) यांनी शेतीकामासाठी हदगाव येथील एसबीआय बँकेतून एक लाख रुपये आपल्या बँक खात्यातून काढले. सदरची रक्कम एका पिशवीत ठेवून पिशवी आपल्या दुचाकीला अडकवली. थोड्या अंतरावर गेल्यानंतर भाजी मंडई येथे पोहोचताच त्यांनी दुचाकी बाजूला उभी करून भाजी खरेदी करत होते. यावेळी अज्ञात चोरट्याने दुचाकीला लावलेली एक लाख रुपये किमतीची बॅग चोरून नेली.

भाजी खरेदी केल्यानंतर आपल्या दुचाकीला लावलेली पिशवी दिसत नसल्याने त्यांनी एकच आरडाओरडा केला. त्यानंतर मोठ्या प्रमाणात त्या ठिकाणी शेतकरी, नागरिक जमा झाले. घडलेला प्रकार त्यांनी हदगाव पोलीस ठाण्यात जाऊन सांगितला. त्यानंतर त्यांच्या फिर्यादीवरून हदगाव पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पोलीस हवालदार जुडे करत आहेत.

**नांदासौख्यभरे**

**भोसले–पाटील**

**नांदेड–** मुखेड येथील रहिवासी डॉ. सौ. माधवी डॉ. व्यंकट माणिकराव भोसले यांची कन्या डॉ. वेणुश्रद्धा हिचा शुभविवाह बुलढाणा जिल्ह्यातील मलकापूर येथील रहिवासी डॉ. सौ. प्रतिभा डॉ. गजानन पाटील यांचे चिरंजीव डॉ. प्रणव यांचेसमवेत आज शुक्रवार, दि. १८ जुलै २०२५ रोजी दुपारी १२.३३ वाजता हॉटेल आकृती, कौठा, नांदेड येथे विवाह सोहळा संपन्न होत आहे. त्यानिमित्त वधू–वरांना हार्दिक शुभेच्छा!

–मुख्य संपादक

# महाराष्ट्र राज्य परिचारिका संघटना यांचे एक दिवसीय कामबंद आंदोलन

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)** – सातव्या वेतन आयोगातील वेतनत्रुटी आणि कंत्राटी भरतीच्या निषेधार्थ महाराष्ट्र राज्य परिचारिका संघटनेचे राज्यव्यापी आंदोलन शाखा नांदेड यांच्या वतीने शासकीय वैद्यकीय महाविद्यालय तथा रूग्णालय विष्णुपुरी येथे करण्यात आले. या आंदोलनात शंभर टक्के परिचारिका सहभागी झाल्या होत्या.



राज्यात सातवा वेतन आयोग लागू करण्यासाठी २०१७ साली बक्षी समिती गठीत करण्यात आली. बक्षी समितीसमोर महाराष्ट्र राज्य परिचारिका संघटना मुख्यालय लातूर संघटनेने राज्यातील परिचारिका संवर्गातील सर्व स्तरावरील पदाच्या मागण्या संदर्भासहित सादर केल्या. त्यानंतर एप्रिल २०१९ ला बक्षी समितीच्या शिफारसीनुसार १ जाने २०१६ पासून सातवा वेतन आयोग लागू करण्यात आला. त्यात असलेल्या त्रुटी निवारणासाठी मार्च २०२३ मध्ये बक्षी समितीचा खंड २ जाहीर करण्यात आला होता. या खंड २ मध्ये परिचारिका संवर्गाच्या वेतन त्रुटीचे निराकरण होणे अपेक्षित असताना पुन्हा खंड २ मध्ये सुद्धा अधिपरिचारिका, परिसेविका,पाठ्यनिर्देशिका तसेच सार्वजनिक आरोग्य विभागातील बालरोग परिचारिका या पदावरील अन्याय दूर झाला नाही, असा परिचारिकांचा आक्षेप आहे.

समकक्ष पदांचा सुधारित वेतनश्रेणी लागू झाली, परंतु काही पदावर अन्याय कायम राहिला. या अनुषंगाने महाराष्ट्र राज्य परिचारिका संघटनेच्या वतीने प्रशासकीय विभाग व शासनाच्या या बाबी लक्षात आणून दिल्या. तसेच, न्यायालयातही दाद मागितली.विविध संघटनांच्या न्यायालयीन प्रकरणामुळे शासनाने पुन्हा वेतन त्रुटी निवारणासाठी मुकेश खुल्लर यांच्या अध्यक्षतेखाली खुल्लर समिती गठित केली. या समिती पुढे सुद्धा संघटनेच्या वतीने वेतन त्रुटी निवारणास्तव सादरीकरण करण्यात आले, परंतु पुन्हा एकदा अधिपरिचारिका, परिसेविका, पाठ्यनिर्देशिका या पदावर कार्यरत परिचारिका संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या वेतनातील अन्याय दूर न झाल्यामुळे परिचारिकांच्या पदरी घोर निराशा आली आहे, असे त्यांचे म्हणणे आहे. अधिपरिचारिका (Staff Nurse)/ परिसेविका् (SisIncharge), पदावरील कर्मचारी हे प्रत्यक्षपणे जीवाची पर्वा न करता रुग्णसेवा देतात.कोवीड काळात परिचारिकांनी सण/उत्सव, मुलंबाळं, कौटुंबिक जबाबदाऱ्या बाजूला ठेवून रुणांची सेवा केली. आजही करत आहेत, तर पाठ्यनिर्देशिका पदावरील कर्मचारी परिचारिकांना शिक्षण देण्याचे कार्य करतात, म्हणून पंतप्रधान यांनी परिचारिकांना फ्रंटलाईन योद्धा असे संबोधले आहे. या पदावरील कर्मचाऱ्यांच्या वेतनातील त्रुटी दूर न झाल्याने शासन दरबारी परिचारिका संवर्ग हा कायम दुर्लक्षित असल्याची राज्यातील परिचारिकांची धारणा झाली आहे. यामुळे परिचारिकामध्ये संतप्त भावना निर्माण झालेल्या असतानाच, वैद्यकीय शिक्षण विभागाने दि ६ जून रोजी परिचारिकांच्या कंत्राटी भरतीचे परिपत्रक निर्गमित केले असून त्याचा तीव्र निषेध परिचारिका संवर्गामधून केला जात आहे. सन २०२२ मध्ये शासनाने परिचारिकांच्या कंत्राटी भरतीचा शासन निर्णय निर्गमित केला होता. त्यास राज्यभरातून कडाडून विरोध झाला होता.

चित्र नरेंद्र गडप्पा




**नांदेड**–शिवसेना शहर प्रमुख तथा माजी नगरसेवक तुलजेश यादव यांच्या वाढदिवसानिमित्त प्रतिभा निकेतन हायस्कूल येथे विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप व विविध समाजोपयोगी उपक्रम राबवून वाढदिवस साजरा करण्यात आला. यावेळी भाजपाचे बाळासाहेब पांडे, शीतल खांडील, माजी नगरसेवक अभिषेक सौदे, राष्ट्रीय चर्मकार महासघाचे प्रदेशाध्यक्ष माधव गायकवाड, दत्तराव तिडके, बालाजी चंदवाड, दत्तात्रय पईतवार, राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे युवक जिल्हाध्यक्ष संदीप गोरे, डॉ. दिनेश शर्मा, दुर्गेश बागडे, मनोज पाटील रूईकर, अभिमन्यू मंडले, सोमेश वायाळ, देवेंद्र यादव, संदीप गोरे, कुलदीप भद्रे, शुभम यादव, कमलेश यादव, माधव शेटे, शोएब खान, सचिन कुरूडेकर, अब्दुल वासे, बबलू यादव, माणिक यादव, आकाश कांबळे, माणिक यादव, अतिख खान आदींची उपस्थिती होती. (छाया–बैस, गडप्पा)

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड–४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड–४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड–(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com